श्रीरामः शरणम्

श्रीमत्करुणामृतघनरामस्मरणानंदित

# भक्तमयूरकेकावलि

---

वाग्देवि पाठीं बसुनी वदे हो !
" मोरा ! तुझा वाणिविलास पाहो.



तो सर्प खावोच, पिसांहि वाहो,
अज्ञानसर्पा प्रतिकाळ तूं हो."

---

संपादक व प्रकाशक

रामकृष्ण दत्तात्रेय पंतपराडकर

---

हनुमज्जयंति शके १८४६ } मयूरपुण्यतिथि (१३०) { तारीख १९।४।२४

# केकावलीनें सुचविलेले कांहीं विचार

**नसतां अंतर्दृष्टी हो कष्टी बाह्यदृष्टिची सृष्टी,**
**आर्याकेकावलि तरि देवो रसिकांसि जागृती तुष्टी. १**
**आर्याकेकावलि करि कुंठित, मग हो! भ्रमास काय उणें?**
**काव्येतिहासवेत्ते हरोत किंवा वरोत त्या स्वगुणें. २**

१. आज हनुमज्जयंती आहे. रामभक्त हनुमान जन्माला आले त्याच तिथीस रामभक्त मोरोपंत आपली इहलोकची यात्रा संपवून रामरूप झाले. या गोष्टीस आज बरोबर १३० वर्षे झालीं. आदर्शभूत अशा ज्या महान् व्यक्ति होतात त्यांचे ठिकाणच्या सद्गुणसदाचारादि विशेषांची छाया आपणावर पडावी व आपणास आत्मोद्धाराच्या कामीं त्या छायेचा उपयोग व्हावा, हीच अशा महान् व्यक्तींच्या जन्मतिथीचे अथवा पुण्यतिथीचे दिवस श्रद्धेनें पाळण्यांत आपली इच्छा असते. अशाच इच्छेनें प्रेरित होऊन मी आजच्या पुण्यतिथीच्या मुहूर्तावर मयूरवाचकांचे हातीं, मयूरकवीचें आजपर्यंत त्रुटित स्वरूपांत प्रसिद्ध असलेलें पण संपूर्ण स्वरूपांत अप्रसिद्ध असलेलें, आर्याकेकावलि हें काव्य देत आहें. कृष्णविजयाला मंत्रभागवतांतर्गत पण पूर्वरचित दशमस्कंधामुळें लक्षणेनें बृहद्दशम हें नांव प्राप्त झालें, तसेंच या केकावलीचे मागील आर्या हें उपपद समजावें. प्रायः केकावलि म्हटलें म्हणजे पृथ्वीवृत्तांतील १२१ श्लोकांचें, कृतांतकटकामलध्वजजरा दिसों लागल्यावेळीं पंतांनीं रचलेलें, काव्य डोळयापुढें उभें रहातें. पण केकावलि म्हटल्याबरोबर पंतांच्या इच्छेप्रमाणें पाहूं गेलें असतां, पहिल्यानें हें, "बा! जीवदान दे गा!" अशी करुणापूर्ण आरोळी ठोकलेलें आर्याउपपदान्वित काव्यच ओळखावयास पाहिजे. नामरसायननामक हनुमत्स्तोत्रांत पंतांनीं ज्या पूर्वरचित स्वग्रंथकृतींचा नामनिर्देश केला आहे, त्यांतील केकावलि ती हीच आर्याकेकावलि.

२. ही आर्याकेकावलि सन १९१० सालीं पहिल्यानें माझे वाचनांत आली. त्याचवेळीं या काव्यांत कवीच्या पूर्वचरित्रांतील कांहीं तरी चमत्कारिक घडामोडींचा उल्लेख आहे असें वेड माझे डोक्यांत शिरलें. सन १९११ सालीं केसरींत 'पंत व त्यांची कविता' या मथळयाखालीं लिहिलेल्या लेखमालेंतील तां. २१।४।११ चे केसरीचे अंकांत प्रसिद्ध झालेल्या चवथ्या लेखांकांत मीं हें माझें वेड पहिल्यानें जनतेच्या वेशीवर टांगलें; परंतु वर्तमानपत्राच्या वेशीचे रूपरंग ज्या त्या अंकापुरतेच टिकतात; लोकांच्या डोळयांपुढें कायम राहून जो व जितका उपयोग व्हावा तो व तितका होत नाहीं, असा या वेडाचे बाबतींत तरी मला

अनुभव आल्यामुळें, त्यानंतर आज तेरा वर्षांनीं त्या आर्याकेकावलीच्या माझ्या आवडत्या वेडाकरितां मी प्रस्तुत पुस्तकरूपानें स्वतंत्रच वेस बांधून तिच्यावर तें वेड दुसऱ्यानें टांगीत आहें. आतां तरी काव्येतिहासवेत्ते लोक हें माझें डोक्यांत शिरलेलें वेड सप्रमाण बाहेर हुसकून लावोत किंवा स्वतःच त्या वेडाला आपलें म्हणोत !

३. या आर्याकेकावलीच्या नक्की रचनाकालापेक्षां नक्की रचनानिमित्त स्थलाचें अनुमान करण्यास या काव्यांतच अधिक सबळ पुरावा उपलब्ध होतो. या केकावलींतील २१–२२, ३४ ते ५७, ६३ ते ६६, ७१–७२, ९१ पासून ९८ व १३२ या आर्यांवर नजर टाका. कांहींतरी कविचरित्रात्मक संदर्भज्ञानाचे अभावीं केवळ वाच्यार्थानें अर्थानंदप्रत्यय येतो किंवा वाच्यार्थानेंहि कविचरित्रात्मक अज्ञात संदर्भाकडे मन ओढ घेतें याचा अनुभव घ्या. म्हणजे माझें वेड कोणत्या 'पंक्ती' आहे याचा कांहींसा बोध होईल. कविवर्य मोरोपंतांचा जन्मशक १६५१ हा पूर्वीपासून मान्य करण्यांत आला आहे. जन्मस्थान पन्हाळगड हेंहि मान्य आहे. त्यांचा विद्याभ्यास पुरा होईपर्यंतचें आयुष्यहि त्यांनीं पन्हाळगडावर स्वगृहीं राहून काढलें आहे, ह्या सामान्य विधानांतहि आक्षेप घेण्याजोगी कोणतीच शंका नाहीं. पंतासारखा असामान्य विद्यार्थी आपणास आजन्म विद्यार्थी असेंच म्हणवून घेत असला तरी आपण सामान्य लोक कांहीं ठरीव वयोमर्यादेपर्यंतच विद्यार्थिदशा मानीत असतों व त्याप्रमाणें पंतांची विद्यार्थिदशा पन्हाळगडावरच संपूर्ण झाली होती. पंतांचे वडिलानीं पंतांचे अगोदरच पन्हाळगडास रामराम ठोकून बारामतीचा रस्ता सुधारला होता व तेथें नाइकांचा आश्रयहि मिळविला होता, हेंहि कबूल. पण प्रस्तुत केकावलीचरिचित पंतचरित्रकार पांगारकर म्हणतात त्याप्रमाणें पंताना पन्हाळगड सोडण्याचा जो प्रसंग आला तो केवळ पाव आण्याच्या चूकभुलीनें आला किंवा मनुष्यमात्रास सोळा आणे प्रिय असणाऱ्या आपल्या जीवाच्या बचावार्थ आला, याबद्दल या आर्याकेकावलीवरूनच मला दृढ शंका येते. पंतांनीं शक १६७४ मध्यें लिहिलेल्या नैषधोदय, अनर्घ्यराघव, व मुरारिनाटक या पोथ्या पाराशरक्षेत्रीं म्हणजे पन्हाळगडावर 'स्वकृते स्वगृहे' लिहिलेल्या आहेत व पंतचरित्रकारांनींहि पृष्ठ २३ वर तसा निर्देश केलेला आहे; मग पंतचरित्रकारांचे मतें शक १६७५ मध्यें पाव आण्याचे चुकीचे निमित्तानें आलेल्या वैराग्यलहरींत पंतांनीं पन्हाळगड सोडला व त्याबरोबरच तेथील स्वगृहहि, सर्व बेवारशांचें वारस जें तेथील सरकार त्याचे ताब्यांत दिलें असें होतें; वैराग्य प्राप्त व्हावयाचें असलें तर तें क्षणार्धांतच अंगाला चिकटतें; गर्भाप्रमाणें कित्येक महिन्यांच्या दीर्घकाळपर्यंत त्याची वाढ व्हावी लागत नाहीं हें मी जाणतों. पण या घरावर एकट्या पंतांचीच मालकी होती असें मानतां येत नाहीं. त्यांचे वडील हयात होते, वडील बंधु सोनोपंत—जे आपल्या

तऱ्हेवाईक स्वभावामुळें मोरोपंतापासून विभक्त रहात असत ते—होते, एक धाकटा भाऊहि होता, यांपैकीं कोणीच पंतांच्या या अकाल किंवा आकस्मिक वैराग्याबद्दल आपणाला भोगाव्या लागणाऱ्या भूदंडाची क्षिती बाळगली नाहीं हें कसें? बारामतीस मोरोपंतांचे वडील परगृहींच दिवस काढीत होते व पुढें मोरोपंतांनीं आपल्या गुणावर शक १६९९ मध्यें बहुधा त्याच परगृहाचें बाबूजी नाइकांचे कृपेनें स्वगृहांत रूपान्तर झालेलें पाहिलें होतें. संसारी मनुष्याला सत्तेच्या जागेचा केवढा आधार वाटतो व शक्य त्या खटपटी लटपटी करून आपल्या पायाखालची जागा जाऊं नये अथवा आपल्या पायाखालची जागा सत्तेची असावी, व्हावी, यासाठीं तो किती धडपड करीत असतो हें कोणासहि सांगावयास नको. पांगारकरांच्या माहितीप्रमाणें पंतांच्या वडिलांना राजदंडभय प्राप्त झालें असतांहि ते आपल्या पोटचे दोन गोळे पन्हाळगडास ठेवून व आपलें घर कायम राखून तेथून कसें निसटूं शकतात? पंतांनीं आपल्या हिशोबांतील अवघ्या पाव आण्याची चूक चिकाटीनें शोधून काढून मालकाकडून "मोरोबा! तूं इतकी एकाग्रता परमेश्वराचे ठिकाणीं लावलीस तर परमेश्वरहि तुला भेटेल" अशा आशयाचे शाबासकीचे उद्गार वदविले, असें पांगारकरादि लोक पंतांचें पूर्वचरित्र रंगवीत असतात. पण मग अशा शांतियुक्त विवेकवैराग्याचे लहरींत येऊन पन्हाळगडासारखें निसर्गरमणीय व त्यांतहि जन्मभूमि या नात्यानें प्रियकर वाटावें असें स्थान, गुरुसान्निध्य, स्वगृह हा सर्व मोहपाश झुगारून देऊन आपल्या नूतनोद्भूत परमार्थप्रवृत्तीला अधिक अनुकूल म्हणूनच बाबूजी नाइकांच्या पंक्तीचें जेवण, पितृबंधुसहवास, परगृहनिवास हा महालाभ पंतांनीं साधला, असें अगदींच असंभवनीय कार्यकारणाचें नातें जोडावें लागतें. शिवाय पांगारकरांच्या मताप्रमाणें पंत बारामतीस रहावयास आल्यानंतर त्यांचा विवाह झाला, ही गोष्ट या पाव आण्यानें उत्पन्न केलेल्या परमार्थप्रवृत्तीला फारशी सुसंगत दिसत नाहीं. व मोरोपंतांच्या काळांतील सामाजिक परिस्थितीचा विचार केला असतां, पंत हे पुरुष म्हणून वयाच्या २४।२५ वर्षांपर्यंतहि अविवाहित रहाणें शक्य असलें तरी विवाहानंतर लगेच एक वर्षानें म्हणजे शके १६७६ मध्यें पंतांच्या मांडीवर पहिलें पुत्ररत्न बसविण्याइतक्या प्रौढ वयाची वधू पंतांना मिळाली, हा वस्तुस्थितिविपर्यास वाटतो. पंतांनीं आपल्या पित्याचे दर्शनास बारा वर्षे उलटून जाऊन विधीनें देवळांत पितृदर्शन घेण्याची पाळी येऊं नये यासाठीं याचवेळीं अनायासें पाव आण्याच्या चुकीनें उत्पन्न झालेल्या वैराग्यलहरीचा फायदा घेऊन पन्हाळगडावरून पाय काढला, असाहि कांहीं मजकूर चरित्रग्रंथांत आहे. अगोदर बाबूजी नाईक शक १६६५ मध्यें, किंबहुना त्यानंतरच, साताऱ्चें शाहूमहाराजांचें सान्निध्य सोडून, आरबी शक ११४४ मध्यें १५ जमादिलावलला मिळालेल्या सनदेप्रमाणें बारामती महालाचा उपभोग घेण्यास अधिकारी झाले व नाइकांनीं

आपलें रहाण्याचें कायम व मुख्य ठिकाण म्हणून बारामतीस " पेशवाई तोलाचा " जो वाडा बांधला तो या सनदेनंतर होय, ही गोष्ट चरित्रग्रंथांतच नमूद आहे. पंतांचे वडील शक १६६५ पूर्वी पन्हाळयाहून बारामतीस बाबूजी नाइकांचा आश्रय हेरून येण्याला प्रत्यक्ष काळाचीच हरकत आहे ! अगदीं एका वर्षींच बाबूजी नाइकांनीं व पंतांच्या रामजीपंतांनीं लागोपाठ बारामतींत प्रवेश केला असें मानलें तरी पंतांना अगदीं विधियुक्त पितृदर्शन घ्यावें लागण्याचें भय शक १६७७ पूर्वी उत्पन्न होण्याचें कारण दिसत नाहीं. ती आख्यायिका खरी मानावी तर, रामाजीपंत "हे कोंकणपरिचयाचे बाबूजी नाईक" हेरून बारामतीस गेले असें न मानतां, ते बाबूजी नाईक हे बारामतीमहालपती होण्यापूर्वींच गेले होते असें मानण्याची आपत्ति ओढवेल, किंवा ते प्रथम साताऱ्यास बाबूजींकडे गेले व तेथून बाबूजीबरोबर बारामतीस पोंचले असें मानावें लागेल.

४. प्रस्तुत आर्याकेकावलीच्या संदर्भार्थनिर्णयप्रयत्नाचे वेळीं पन्हाळगड, सातारा व पुणें या तीन ठिकाणच्या राजकीय उलाढालींकडे सूक्ष्म नजर टाकावी लागते. मोरोपंत जन्मास आले त्यापूर्वी सुमारें सतरा वर्षे राजारामाचा, राजसबाईचे पोटीं झालेला, दुसरा पुत्र संभाजी हा कोल्हापूर संस्थानचे गादीवर होता व मोरोपंत सुमारें २ वर्षांचे झाले तेव्हांच संभाजीनें शक १६५३ चैत्र वद्य २ स शाहूशीं सख्यत्वाचा तह करून सातारा–कोल्हापूर हा तंटा निकालांत काढला व शाहूनेंहि कोल्हापूर हें स्वतंत्र राज्य म्हणून मान्य केलें. यापुढें मोरोपंतांच्या वयाच्या १९।२० व्या वर्षी–शक १६७१ मध्यें–शाहू वारला. त्याचे थोडें आगेमागें मात्र, शाहूचे मागें कोल्हापुरच्या संभाजीसच साताऱ्याहि राज्याचा अधिपति मानावा किंवा ताराबाईचा नातू रामराजा याला शाहूचा दत्तक पुत्र ठरवून सातारचा राजा करावें याविषयीं सातारापक्ष, कोल्हापुरपक्ष व पेशवेपक्ष या तिन पक्षांमध्यें कांहींसा विकल्प उत्पन्न झाला; पण अखेर शाहूच्या लेखी इच्छेप्रमाणेंच कोल्हापुरच्या राज्याचें स्वातंत्र्य पेशव्यांनीं मान्य करून रामराजास सातारच्या गादीवर बसविलें. व पुढें हा विकल्पहि मावळून गेला, असें शक १६७६ मध्यें कर्नाटकचा चौथाई ऐवज वसूल करण्याची कामगिरी संभाजीनें बाळाजी बाजिरावावर सोंपविली यावरून वाटतें. ताराबाईचा नातू सातारच्या गादीवर बसविण्यापुरते पेशवे व नाईक एकमताचे झाले; पण पुढें लवकरच जो ताराबाईचा म्हणून पक्ष निर्माण झाला त्यांत नाईक शिरल्यामुळें पेशव्यांचें व त्यांचें बिनसलें. या काळांत दृष्टी नेऊन सातारा व कोल्हापूर या दोन राज्यांकडे ती वळविली असतां, साताऱ्यास कजाग पण वीरवृत्तीच्या व मुत्सद्दी ताराबाईचीं कारस्थानें व कोल्हापुरास संभाजीवरहि कदाचित् वरचष्मा ठेवून चाललेली, नुसत्या कजागच नव्हे तर नरबलिप्रेमी "कर्दनकाळ" असलेल्या त्याच्या बायकोची म्हणजे जिजाबाईचीं कारस्थानें, असा देखावा दृष्टीस पडतो.

संभाजीनें ताराबाईला तिचा पुत्र शिवाजी मरून आपण गादीवर येतांच कारागृहांत टाकलें होतें. ही तरी प्रतिक्रियाच होती. कारण, ताराबाईनेंहि आपला मुलगा गादीवर बसवितांना या संभाजीला व त्याच्या आईला कारागृहांत कोंडून ठेवण्याची क्रिया पूर्वी केली होती. अर्थात् ताराबाई व संभाजी यांचीं मनें शुद्ध नसावींतच. शाहू व ताराबाई यांचा लढा तर पूर्वीच होऊन चुकला असल्यामुळें त्यांचींहि मनें शुद्ध असणें अशक्य आहे. आपल्या नवऱ्याला तुरुंगांत टाकलेल्या या ताराबाईनें नातवाला साताराची गादी साधून देऊन वर डोकें काढलेलें जिजा-बाईला मानवणें शक्य नाहीं. पण या साऱ्या धुसफुशींचा काय उपयोग ? शाहू-मुळें उदयास आलेल्या पेशव्यांचें मनगट या वेळीं जोरांत होतें. त्यांच्या त्या वेळच्या राजकारणविषयक ध्येयाला आडवें येण्याचा संभव वाटणारें सर्व कापून काढण्याची धमक त्यांचे ठिकाणीं होती, व म्हणूनच धन्यास प्रधान प्रतिबंधांत ठेवूं शकत होते. (मो. च. पृ. १११). आपापलें इष्ट साधण्याच्या धडपडींत राजकार-णामध्यें कोण केव्हां कोणत्या पक्षांत सामील होऊन आपणास कोणत्या पक्षाचा म्हणवील याचा केव्हांच नेम नसतो. या धडपडीमुळेंच एकीकडून पेशव्यांचा आप्त असा बाबूजी नाईक दुसरीकडून पेशव्यांना प्रतिपक्षिस्थानीं होता. कारण पेशवाई-पदावर डोळा ठेवून त्याच्या उलाढाली चालत. ती आशा संपल्यावर महत्त्वाकांक्षी बाबूजीचा डोळा प्रतिनिधिपदावर गेला व त्या पदावर अधिष्ठित असलेल्या ज्या व्यक्तीशीं संगनमत करून बाबूजी ताराबाईपक्षांत सामील झाला होता, त्या व्यक्ती-चेंच आसन आपल्याखालीं ओढण्याचा खटाटोप, ताराबाईच्या अनुमतीनें सुमारें शक १६७९ मध्यें म्हणजे पंतांच्या वयाच्या २८ व्या वर्षी बाबूजी नाइकानें केला होता. तोहि खटाटोप निष्फळ झाल्यावर मात्र बाबूजी नाईक हे " गोष्टी सांगेन युक्तिच्या चार " अशा स्वरूपाचे बैठे मुत्सद्दी अथवा फार तर प्रसंगविशेषीं पेशव्यांचे हांकेस ओ देणारे असे झाले. प्रारंभीं शाहूच्या व नंतर ताराबाईच्या पक्षांत शिरल्यामुळें कोल्हापूरचाहि राजकीय दृष्टिकोन बाबूजीचे बाबतींत शुद्ध व सरळ असेल असें वाटत नाहीं. अशा बाबूजी नाइकाकडे ज्याचे वडील आहेत तोच हा आपलेकडे नोकरीस असलेला बाबूजीचा गुप्त हेर मोरोबा असा खोटा आळ, संभाजी शक १६८२ मध्यें वारल्यानंतर शक १६९४ माघ वद्य ११ पर्यंत झालेल्या जिजाबाई, येसाजी शिंदे व मामलेदार कुणबिणी यांच्या अपूर्व कारकीर्दींत कारकून मोरो-पंतावर येऊन कांहीं उपसर्ग पोंचला असेल काय, अशी शंका मनाला शिवल्या-वांचून रहात नाहीं. या अनुमानाला झालें तर प्रमाणभूत असें एक वृत्त इतिहासांत नमूद आहे. शक १६८५ मध्यें ज्या निजामाला बाबूजीनें गोदावरीच्या पलीकडे रेटीत नेलें त्याच निजामाशीं गुप्तपणें पेशव्यांविरुद्ध पत्रव्यवहारादि दळणवळण चालू ठेव-ण्याचें राजकारण जिजाबाई-येसाजीप्रमुख कोल्हापूरची तेव्हांची राज्यकर्ती मंडळी

सुमारें याच वेळेस खेळत होती व तें उघडकीस येऊन त्याबद्दल त्यांना पेशव्यांनीं शासनहि केलें होतें, असें इतिहासावरून दिसतें; व म्हणूनच बाबूजींविषयीं कोल्हापुरचे मनांत तेढ असावी असें वाटतें. हें लिहितांना बाबूजींविषयक तेढीच्या वड्याचें तेल मोरोपंतरूपी वांग्यावरहि काढूं पहाण्याइतक्या क्षुद्र मनाचीं सुभेदार येसाजी वगैरे माणसें मी मानीत आहें, हें उघड आहे.

५. मी केसरींत लिहिलेल्या प्रथमनिर्दिष्ट लेखांत आर्याकेकावलिनिमित्तप्रसंग संभाजीच्या कारकीर्दीत घडला असावा असा तर्क नमूद केला आहे; पण ती माझी नजरचूक झाली असावी असें बऱ्याच विचारान्तीं व संशोधनान्तीं माझें मलाच आतां वाटत आहे. याचा अर्थ हा, हा संभाजी म्हणजे कोणी मोठा सत्पुरुष होता असा नवीन शोध मला लागला आहे, असें नव्हे. मोडकांच्या कोल्हापुरच्या इतिहासांतील या संभाजीविषयींची " हा मोठा शूर होता. यास लूट करण्याची मोठी आवड असे. तो राजविलासांत पुष्कळ वेळ घालवी. व पुष्कळ द्रव्यहि खर्च करी. " ही माहिती आजहि माझ्या डोळयापुढें आहे; तथापि तेवढ्यावरून मोरोपंतांना पन्हाळगडचें आपलें घर सरकारजमा करावयास देऊन पन्हाळगड सोडण्याची पाळी आली असेल असें वाटत नाहीं. शिवाय शक १६८२ मध्यें सुमारें कार्तिक मार्गशीर्षांत ( सन १७६० डिसेंबर ) संभाजी कोल्हापुराजवळील वडगांव येथें मरण पावला; तत्पूर्वी वैशाख ते भाद्रपदाच्या दरम्यान आलेल्या अधिकमासांत पंत पन्हाळयास होते, ( मो. च. पृ. २९ ) व राघवपांडवीयाची पोथी लिहून घेण्याइतके स्वस्थ मनानें होते. आर्याकेकावलींतील त्यांची तळमळ जर संभाजीच्या कारकीर्दीत उत्पन्न झाली असती, तर ते परत गडावर निदान संभाजीच्या कारकीर्दीत तरी गुरुदर्शनलोभानें येतेना. परंतु ज्याअर्थी या संभाजीनें शक १६८० मध्यें पंतांच्या गुरुघराण्याला इनामें दिल्याच्या सनदा उपलब्ध आहेत, त्याअर्थी गडावर राहिलेल्या आश्रयार्ह लोकांचे बाबतींत संभाजीचें वर्तन वावगें दिसत नाहीं. आर्याकेकावलीचा निमित्तप्रसंग मोरोपंतचरित्राचे दृष्टीनें घडणें शक्य असलें तर कोल्हापूरच्या राज्यांतच शक्य आहे व तितका अंदाधुंदीचा काळ हा संभाजी मेल्याबरोबर आलाहि होता. " संभाजी राजविलासांत पुष्कळ वेळ व द्रव्य खर्च करीत होता" तरी तो निपुत्रिक मेला होता, त्याचे मागें त्याच्या "कर्दनकाळ" पत्नीला हें एवढें राजैश्वर्य हातचें जातें कीं काय अशी धास्ती पडली होती. मोठ्या मिनतवारीनें जिजाबाईनें माधवराव बल्लाळ पेशव्याची संमति मिळवून मालोजी भोंसल्यांच्या वंशांतील शहाजी भोसले खानवटकर यांचा ५ वर्षांचा मुलगा शक १६८४ च्या दसऱ्यास दत्तक घेतला; पण या सुमारें दोन वर्षांच्या अराजक काळांत जिजाबाईच्या अशाश्वत स्त्रीबुद्धीचा प्रत्यय येऊन चुकल्यामुळें श्री. भगवंत रामचंद्र पंत अमात्य यानीं जिजाबाईचें आपला राज्यकारभार पहाण्याचें निमंत्रण

झिडकारलें होतें व त्यामुळें या कर्दनकाळ बाईला चीड येऊन तिनें पंत अमात्यांच्या नाकावर टिचून, आपल्या माहेरचे लेकावळे येसाजीराव शिंदे यांस कारभारी म्हणून व रंगू, गंगू, भागू नागू व लिंगू या " शहाण्या कुणबिणी-पंचकास" निरनिराळ्या पेव्यांचे अधिकारी म्हणून, असा अश्रुतपूर्व मुत्सद्यांचा मेळा आपल्या भोंवतीं गोळा केला होता. व या दिव्य मुत्सद्यांच्या कारकीर्दींतच कोल्हापुरांत न भूतो न भविष्यति अशी राजव्यवस्थेचे कामीं गूघाण झांली असें इतिहास बोलतो. एखाद्यावर खोटा ' आळ ' घेऊन " धनार्थ प्रजेस ताप देणारे कळीमधील क्षुद्र नृप " हे येसाजीराव असावेत काय ? " [ मी ] प्रमदांत श्रम पावलों असूनहि जे क्षुद्र [फुकटची सहानुभूतिहि न दाखवितां उलट] दांत विचकून हसतात, अशांची नोकरी त्यांच्यासारख्या वृत्तीच्या माणसांनींच करावी; माझ्या-सारख्यांनीं हे रामा ! तुझ्या सेवेलाच वाहून घ्यावें " या उद्गारांतील क्षुद्र व्यक्ति येसाजीच असेल काय ? श्रमदायक प्रमदा या कोल्हापूरच्या राज्यकारभाराची गूघाण करणाऱ्या कुणबिणी किंवा त्यांनींहि मनुष्यस्वभावानुसार असाच आणखी दुय्यम कुणबिणींचा तांडा गोळा केला असल्यास तो असेल काय ? याच कारकीर्दींतील जर आर्याकेकावलिप्रसंग असेल तर या स्त्रीराज्यांत मोरोपंतासारख्या विद्यारत, सत्वस्थ, भगवदनुगामी पण तरुण मनुष्याला काय काय आपदा व अपमान सोसावे लागले असतील तेवढे थोडे आहेत !

६. जिजाबाई शक १६९४ मध्यें वारल्यानंतर पुढें ११ वर्षें तर एकट्या येसा-जीचीच कारकीर्द चालू होती. जिजाबाई वारली तेव्हां दत्तक शिवाजीचें वय १५ वर्षांचें होतें व तो तेव्हां सिद्धेश्वरमहाराजांच्या शिक्षेंत होता, असें कोल्हापुरच्या इति-हासांत लिहिलें आहे. या सिद्धेश्वरमहाराजांच्या चरित्राचीहि मोरोपंतांच्या चरित्राकरितां चांगली छाननी व्हावयास पाहिजे आहे. सिद्धेश्वर महाराजांची व पंतांची प्रथमभेट नरसिंहपुरास जेव्हां ते " योगसमाधीच्या अभ्यासाकरतां आठ वर्षें राहिले होते " ( मो. च. १३७ ) तेव्हां झाली किंवा सिद्धेश्वर महाराजांनीं आपल्या सिद्धीचे चमत्कार दाखवून शिवाजीला आपल्या शिक्षेंत घेतल्यानंतरहि ते कधींमधीं नरसिंह-पुरास रहात असत व तेथें झाली, याचा शोध घ्यावयास पाहिजे. सिद्धेश्वरमहा-राजांच्या व पंतांच्या प्रथम भेटीचें वर्णन महाराजांच्या घराण्यांतील खास दप्तरीं-तून मोरोपंतचरित्राच्या १३८–१३९ पृष्ठांवर उद्धृत केलेलें आहे त्यावरून, पंतांनीं सन्मणिमाला रचल्यानंतरच सिद्धेश्वर महाराजांची संत अशी कीर्ति त्यांचे कानावर आली होती व अशा संताचें दर्शन घेऊन त्याला सन्मणिमालेंत पंतानीं पुढील आर्येनें गोंविलें होतें, हें वाचकांचे निदर्शनास येईल.

**नमिलें श्रीसिद्धेश्वरभट्टजीबावाचिया सुपदकमला;**
**स्व सन्मणिमालेला सांपडलें आजि हें सुपदक मला.**

पंत या आर्येंत सिद्धेश्वरमहाराज असें न संबोधतां ज्या काळीं ते लोकाना सिद्धेश्वरभटजी या नांवानें माहीत होते त्याच नांवानें संबोधित आहेत, यावरून राजाश्रयानें या साधूचें ऐहिक वैभव साधल्यावर सहाजीकच मिळालेल्या महाराजपदवीपूर्वींची पंतांची भेट असावी असें अनुमान निघतें. कोल्हापुरचे राजे शिवाजी यांनीं सपत्नीक शक १७०१ मध्यें सिद्धेश्वरमहाराजांचा अनुग्रह घेतला. ( मो. च. पृ. १३७ ). तत्पूर्वीं दोन वर्षें महादजी शिंदे यांनीं कोल्हापुरास वेढा देऊन येसाजीला नाक मुठींत धरावयास लावलें होतें. या विजयलाभाच्या जोडीला सिद्धेश्वरमहाराजांच्या दर्शनलाभाचीहि जोड मिळून " हे चरणदर्शन मला जाहलें. पुनीत जाहलों. माझी शिष्यकोटींत गणना असावी " असे नम्रतेचे व शरणागतीचे उद्गार या साधूनें तरवारबहाद्दर महादजीच्या मुखांतून वदविले. मोरोपंत हे सिद्धेश्वर महाराजांचे उभ्या उभ्या दर्शन घेऊन परतले नसून, " पुढें कांहीं दिवस श्रीचे सहवासास राहून श्रीचा निरोप घेऊन पंडित हे आपल्या गांवीं परत गेले " असा उल्लेख बखरींत आहे. या सहवासांत बारामतीपूर्वींच्या मोरोपंतांच्या आयुष्यक्रमाची ओळख झाल्यामुळें तर हा सिद्धपुरुष सिद्धिचमत्काराच्या जोरावर शिवाजीला आपलासा करून कोल्हापुरांतील अंदाधुंदीपासून व गलिच्छ कारभारापासून अलिप्त राखण्याचा चंग बांधून गेला नसेल ना, असा ओझरता संशय माझ्या मनाला शिवतो. सिद्धेश्वरमहाराजांचें योगसाधनस्थान म्हणून लक्षांत रहाणाऱ्या नरसिंहपुरास पंतांचे एक चुलत बंधु शिवरामपंत ( रामचंद्रपंत अमात्यांच्या पदरीं राहिलेल्या मेघश्यामपंतांचे चिरंजीव ) म्हणून रहात होते ( मो. च. पृ. ७९ ). यावरून, सिद्धेश्वर महाराजांची कीर्ति या चुलतभावाकडूनच पहिल्यानें पंतांचे कानावर गेली असावी, असा संशय येतो. तात्पर्य, सिद्धेश्वरमहाराजांच्या पहिल्यापासूनच्या सर्व हालचालींचे शक निश्चित करून देण्याची कृपा कोणी केल्यास पंतचरित्राचे बाबतींत त्यांचा बराच उपयोग होईल.

७. पन्हाळगडावरील पंतांच्या गुरुघराण्याच्या या स्त्रीराज्यकालीन हालचालीकडेहि थोडें लक्ष दिलें तर अगदींच निराशा होत नाहीं. पंतांचा गुरुपुत्र, गुरुबंधु व सन्मित्र या तीन प्रेमरज्जूनीं निगडित झालेला सदाशिव केशव पाध्ये कराडहून एका पत्रांत पंताना लिहितो, " चिरंजीव यज्ञेश्वरोपाध्याय सकुटुंब करवीरीं राहिले आहेत. वर्षत्रय जाहले, आम्ही सर्व कऱ्हाडीं आहों; श्रीपितृचरण गडीं सुखी आहेत. परम अशक्त जाहले आहेत. येथील स्थिति कारभारी यांजमुळें विलक्षण झाली आहे. " दुसऱ्या एका पत्रांत, " भेटीविषयीं बहु उत्कंठित अंतःकरणवृत्ति आहे; येथें श्रीमंत राजश्री पंतसंनिध आहों, दर्शनाविषयीं मानस त्वरायुक्त आहे; घडेल तो सुदीन. " ( मो. च. पृ. १३९—१४० ) असा मजकूर आहे. चरित्रलेखकानीं हे उतारे आपणास सदाशिव पाध्यानीं

पंतांस पाठविलेलीं कांहीं पत्रें पहावयास सांपडलीं आहेत, हें 'आपलें विधान वाचकानीं सत्य मानावें म्हणूनच केवळ दिलेले दिसतात! कारण, त्यांतील मजकुराकडे लक्ष पुरवून चिकित्सा करण्याचें त्यांनीं टाळलें आहे; पण मला तसें करितां येत नाहीं. पंताना हा आपला सहाध्यायी गुरुपुत्र कोठें आहे याची तीन वर्षे दाद नसावी असा काळ कोणता असावा बरें ? ' येथील ' हें स्थलवाचक विशेषण कराडद्योतक मानून समाधान होईल किंवा जुन्या एखाद्या भाषारिवाजाप्रमाणें तें " पितृचरण गडीं सुखी आहेत परम अशक्त जहाले आहेत " यापुढेंच आले असल्यामुळें पन्हाळगडचें द्योतक मानून समाधान होईल ? विलक्षण स्थिति करून सोडणारा कारभारी हा येसाजीच नसेल का ? पहिल्या पत्रांत ' कऱ्हाडीं आहों ' एवढाच निर्देश आहे. पण तेवढ्यानें आपल्या या स्नेह्याची काय स्थिति आहे याचा उलगडा करण्याविषयीं पंतानीं उत्तरीं कळविल्यावरूनच प्रायः पाठविलेल्या प्रत्युत्तरांत, प्रथम पंताना बलोपचयार्थ एक औषध कळविलें आहे, व पुढें ' येथें पंतसंनिध आहों ' असा खुलासा करून सदाशिव पाध्यानीं आपल्या पोटांतील पंतभेटीची तीव्र क्षुधा व्यक्त केली असेल काय ? या दोन्ही पत्रांतील समग्र मजकूर पंतचरित्रवाचकांपुढें ठेवण्याची कृपा पांगारकरांनीं केली असती तर त्यांचेंहि काम झालें असतें, व माझ्यासारख्या दीर्घशंकी लोकांचेंहि समाधान झालें असतें. पण हें जरतरच जेथें तेथें आडवें पडून नेहमीं घाण करतें, त्याला काय करावें ?

८. पंढरपूरचे अनंत पाध्ये हे पन्हाळगडकर पाध्यांचे वतनी भाऊबंद असले तरी पंतांचा व त्यांचा विशेष घरोबा, ते शक १६८० मध्यें त्यांचें कोकणांतील वतन हिरावून घेतल्याबद्दल त्यांचा पेशव्यांशीं इतिहासप्रसिद्ध खटका उडाल्यानंतर पंढरपुरास येऊन राहिल्यावरच जुळला असावा. याच सालीं पाध्यांचें वतन जाण्याचे अगोदर अवघे आठच दिवस पौष शुद्ध ८ ला पंतांनीं आपल्या प्रऱ्हादविजयाच्या पोथीचें लेखन पूर्ण केलें होतें व तें " श्रीमत्केशवगणेशपंडितपदप्रसादादयं ग्रंथोऽगमत्समाप्तिम् " अशा रीतीनें स्मरणपूर्वक गुरुस्मरण करून पूर्ण केलें आहे, यावरून ते तेव्हां पन्हाळगडास गुरुसान्निध होते असें वाटतें. भाद्रपद शुद्ध अष्टमीला पंतांनीं बारामतीस प्रबोधचंद्रोदयनाटकाचें लेखन पूर्ण केल्याचा दाखला आहे. या अनंत पाध्यांचा व सिद्धेश्वरमहाराजांनीं पंढरपूरच्या ज्या अद्वैतानंद योगानंद व वैकुंठानंद या तीन स्वामींचें दर्शन घेतल्याचा उल्लेख सांपडतो, (मो. च. पृ. १३७) त्यांपैकीं अद्वैतानंदांचा, असा उभयतांचा उल्लेख पंतांनीं सन्मणिमालेचे अखेरीस केला आहे. सन्मणिमालेंत पंतमित्र विठोबा दादांचा उल्लेख नाहीं, तो विठोबादादांवर पंतांची स्वतंत्र कविता होती म्हणून नाहीं अथवा सन्मणिमालेच्या रचनाकाळीं पंतांची व विठोबादादांची ओळख भेट झाली नव्हती म्हणून नाहीं ? याचा विचार व शोध व्हावयास पाहिजे.

तसेंच अद्वैतानंदांचे मागून योगानंद व वैकुंठानंद पंढरीस आले म्हणून सन्मणिमालेंतून गळले कीं पंताना ते सन्मणि वाटले नाहींत ? अनंत पाध्यांनीं पंतांना पाठविलेल्या ज्या दोन पत्रांचा उल्लेख चरित्र पृष्ठ ११० वर केलेला आढळतो त्या पत्रांचा शकनिश्चय झाल्यास, एका पत्रांतील " अच्युतानंदगोविंदनामोच्चरण निरंतर करावें; येविषयीं तुम्हांस बहुत लिहावें असें नाहीं" हा सांत्वनपर मजकूर कांहीं विशेष संदर्भाचा आहे किंवा सामान्य आहे याचा पुरा विचार करण्यास, हीं पत्रेंहि चरित्रकारांनीं सदाशिव पाध्यांच्या पत्राप्रमाणेंच वाचकाना वाचूं न देतां नुसती दाखविल्यासारखें केलें असल्यामुळें, शंकितांना अडचण पडली आहे. शक १६८३ च्या आषाढीस पंत पंढरीस होते, असें त्यानीं पंढरपुर–बारामतीच्या वाटेवर नात्यापुत्यास असलेल्या पर्वतीश्वरनामक रमणीय शिवस्थानीं मुक्काम करून कुवलयानंदाच्या पोथीचें लेखन आषाढ कृ. ६ ला पूर्ण केलें आहे, त्यावरून वाटतें. तथापि ही पंतांची पंढरपूरची पहिलीच खेप नसावी. शक १६८०।८२ मध्येंहि ते नेमके चातुर्मासांतच बारामतीस होते, हें बारामतीच्या उल्लेखित पोथ्यांवरून लक्षांत ठेविलें पाहिजे. शक १६८३ च्या पुढें ८७ च्या मार्गशीर्षापर्यंत मात्र स्थानकालोल्लेखित पोथी नाहीं. तथापि सर्वच पोथ्यांवर पंतांनीं स्थानकालोल्लेख लिहिण्याची प्रतिज्ञा केली नव्हती, असा आक्षेप आक्षेपकांकडून येईल याची जाणीव मला आहे. तरी देखील या चार वर्षांच्या पडलेल्या खंडांतच केव्हांतरीं पंत आर्याकेकावलिनिमित्त संकटाच्या खड्डयांत पडले होते कीं काय असा संशय मला व्यक्त करावासा वाटतो नामरसायनाचा १६८५ हा काव्यसंग्रहातील शोधशकहि येथें मला प्रतिकूल नाहीं. बारामतींतील नारायणभट दात्यांच्यान शेजाराचा उल्लेख केलेल्या नामरसायनांत " दाखविलें निजकवन श्रीमदनंताख्य साधुसहि म्यां तें " असा अनंत पाध्यांचा उल्लेख आहे. नामरसायन हा या काव्याचा नामविशेष विचारांत घेतां, "अच्युतानतगोविंदनामोच्चारणभेषजात् । नश्यंती सकला रोगाः सत्यं सत्यं वदाम्यहम् " हा कोणतेंहि औषध घेताना भाविकपणें म्हटला जाणारा श्लोकच अनंतपाध्ये गद्य वाक्याचे रूपानें पंताना सुचवित आहेत व पंतहि त्या सूचनेचा आदर करूनच नामरसायन जपोनि कढवीत आहेत कीं काय असा भास होतो. अनंत व सदाशिव या उभयतांच्याहि उल्लेखांत पंतांचें जें शारीरिक अस्वास्थ्य ध्वनित होतें तें पन्हाळगडावरच्या स्त्रीराज्यांतील फरासखान्यांत घातपातबुद्धीनें कोणीतरी पंतांचे पोटांत शेंदूर पारा अशा प्रकारचा कांहींतरी प्राणघातक पदार्थ कोंबल्यामुळें उत्पन्न झालें असावें, असें मला वाटतें, व या संशयबीजाला आधारभूत भूमि वाङ्मनःप्रार्थनेंतील कांहीं श्लोकांत सांपडतें कीं काय असा संशयहि डोकावतो. तथापि मी त्या संशयाचा पिच्छा अद्याप पुरविलेला नाहीं.

१. आर्याकेकावलींतील ४७ व्या व १५९ व्या आर्यांतील अनुक्रमें अशुभ व

शुभ या पदांचा अन्वय कोणत्या विशेष्यांशीं करणें युक्त होईल, याची वाचकानीं चिकित्सा करावी. ५६ व्या आर्येच्या पूर्वार्धांत " या संकटाबरोबर वारीं लोकेषणादि अनिवार्य " असें मागणें पंतांनीं रामरायाजवळ मागितलें आहे; यावरून खोटा आळ येऊन ओढवलेलें संकट पंतांच्या लौकिकाची हानी करणारें होतें; पण रामकृपेनें संकटमुक्त होतांच केवळ भगवत्सेवेंत आयुष्य वेंचण्याचें वचन देऊन पंत रामाजवळ लोकेषणामुक्तीचें दान दे म्हणून मागत आहेत. यावरून पंतांवरील संकट जसें अशुभ म्हणजे लौकिकहानिकारक तसेंच अशुभ जन भोंवतीं असतां ओढवलें होतें. भक्तमयूरानें आपला करुणामृतघनरामपर टाहो ११३ व्या आर्येपर्यंत अखंडित फोडल्यानंतर थोडा विसावा घेऊन मग आपला मोर्चा १२८ व्या आर्येपर्यंत रामपंचायतनांतील इतर व्यक्तींकडे, तेथून १३५ व्या आर्येपर्यंत नारदशुकपराशरव्यासादि पुराणसंतांकडे, तेथून १४१ पर्यंत पुंडरीकाकडे, तेथून १५६ पर्यंत साक्षात् पांडुरंगाकडे वळवून व १५९ पर्यंत "सिकवा साधुजनाला कैसी शरणागतें करावि नती व गुरुजनभजन शुभ जनीं शिकवा " म्हणून आपल्या उपास्याला व उपास्यभक्तांना आळवून, पुनः १७२ व्या आर्येपर्यंत पांडुरंगाचाच पिच्छा पुरविल्यावर, अखेरच्या दोन मनोरम आर्यांनीं परत आपल्या रामरायाच्याच नांवानें टाहो फोडून आनंदप्राप्ति झाल्याची पावती दिली आहे. अशा रीतीनें सर्व गूढार्थी आर्यांवर भाष्य लिहित बसलों तर वेळ व जागा पुरणार नाहीं. म्हणून हात आखडता घेतों. आर्याकेकावलीला निमित्त झालेल्या संकटाच्या आंचीनें कवीचें मन विरघळून त्यांतून फक्त आर्याकेकावलीच तेवढी स्रवून बाहेर पडली व तें मन पूर्ववत् घट्ट झालें असेंहि मला वाटत नसून, संशयरत्नावलि, साधुसत्कार, नामसुधाचषक, रामनामार्या, वाङ्मनःप्रार्थना, महद्विज्ञापना, गुरुस्तुतिमुक्तांजालि, विठ्ठलस्तुति व " तूं सागर करुणेचा " इत्यादि पूर्वकाळापासून सर्वत्र व बहुमुखीं राहिलेल्या एकाच आर्येमुळें डोकें वर काढणारें, पण पांगारकरांनीं पंचवटीरामस्तोत्र म्हणून पहिल्यानेंच साग्र प्रसिद्ध केलेलें, रामस्तोत्र वगैरे बरींच प्रकरणें, हे आर्याकेकावलीच्या मागेंपुढें पण कवीच्या मुखांतून एकाच प्राणघातक संकटामुळें निघालेले हुंदके आहेत असें मला वाटतें. भाषासाम्य, रचनापद्धतिसाम्य, विचारसाम्य किंबहुना क्वचित् शब्दसाम्यहि मला असें वाटवीत आहे. पण त्याचा खोल विचार, आर्याकेकावलीपुरतें तरी मयूरवाचक आपलें धोरण कोणतें निश्चित करतात तें पाहून, पुढें करण्याचें मी योजिलें आहे.

१०. पंतांनीं आपले मित्र अनंत पंडित व बाबा पाध्ये या उभयतांस पाठविलेल्या एका पत्राचा, आंतील मजकुराशिवाय, मोघम उल्लेख मो. च. पृ. २८१ वर पांगारकरानीं आपल्या पद्धतीप्रमाणें केला असून, या पत्राच्या पाठीमागें बहुधा बाबा पाध्यानीं रचून ठेवलेली म्हणून पुढील आर्या दिली आहे.

**ऐकुनि विश्व सुखावें ज्या केकीचा अपूर्व तो टाहो,**
**त्याला आयुष्याचा ईशकृपेनें कधीं न तोटा हो।**

या आर्यतील " केकीचा टाहो " हे शब्द आर्याकेकावलीद्योतकच असल्यास उत्तरार्धातील ' आयुष्मान् भव ' अशा अर्थाचा आशीर्वाद आर्याकेकावलिनिमित्त प्रसंग जाणून सहेतुक आहे असें म्हणतां येणार नाहीं काय ?

११. दुसरा महिपतीच अशा राजाराम प्रासादीनें भक्तमंजरीमालानामक एक ग्रंथ महिपतीच्या भक्तविजयग्रंथाची उत्तरकालीन पुरवणी याच धोरणानें रचला आहे. या ग्रंथकाराचा गुरु सिद्धनाथ रामदासी हा मोरोपंतांचा ग्रामबंधु व समकालीन होता. पंतांच्या ३६ व्या वर्षी हा सिद्धनाथ जन्मला; पण जन्मापासून सुमारें तीस वर्षे यानें मोरोपंतांची बारामतींतील कारकीर्द पाहिली होती. या सिद्धनाथाच्या माहितीवरून, पंतांचें देहावसान झाल्यानंतर चाळीस वर्षांनीं राजरामप्रासादीनें पुऱ्या केलेल्या उपरिनिर्दिष्ट ग्रंथांत मोरोपंतचरित्रावर एक अध्याय लिहिला आहे. भक्तांच्या ठिकाणींहि ईशभाव ठेवून वर्णन करणाऱ्या राजरामप्रासादीवर तसा भाव नसलेले लोक डोळे वटारतील असेंच वर्णन त्यानें पंतांचें केलें आहे, हें मला कबूल आहे. पण भाविकपणानें केलेली अत्युक्ति अथवा अन्यथा उक्ति सोडून देऊन सुद्धां राजारामप्रासादीच्या कांहीं उल्लेखांत गूढार्थ असावा असें वाटतें. हा गूढार्थ राखावा म्हणूनहि त्यानें तो राखला नसेल. पण चमत्कारकथनाचे भरांत

**पराशर ऋषीचे गुहेंत । वास्तव्य केलें मोरोपंडित**
**प्रत्यक्ष दर्शन दिधलें तयातें । व्यासपित्यानें**

असा जो उल्लेख पन्हाळगडावरच्या पराशरगुहेचा राजारामप्रासादीनें केला आहे, तो आर्याकेकावलींतील १३२ व्या आर्यंत व्यक्त झालेला कवीचा वृत्तिपालट होण्यास योग्य असें एकान्तस्थान दर्शवितो कीं काय असा संशय येतो. आर्याकेकावलीकालीन संकटाचे वेळीं कवीला या गुहेंत वास्तव्य म्हणजे वस्ती घडली असेल काय ? एकान्तांत साक्षात् परमेश्वरच सर्व संकटांचीं कोडीं कशीं उलगडावीं हें शिकवितो, असें एकान्तप्रेमी माणसाला वाटणें शक्य व स्वाभाविक आहे. अशा रीतीनेंच पंतचरित्राशीं ही पराशरगुहा निगडित झाली असल्यास, तिचें नांव कर्णोपकर्णीं सिद्धनाथाचे कानावर, पंताना व्यासपित्याचा साक्षात्कार झाल्याचें ठिकाण म्हणून, पडणें व तशी माहिती त्यानें आपल्या शिष्यास देणें शक्य आहे. हा सिद्धनाथ व पंत " भूअंतर्गत बैसती विवरीं । संगती बरी परस्परें " अशा रीतीनें पंतांचा साक्षात्परिचित होता, असें राजारामप्रासादी म्हणतो. पन्हाळगडावर गुदरलेल्या संकटामुळें एकान्तप्रेमा वाढलेल्या पंताना लागलेली गुहेची चटक ते बारामतीस आल्यावरहि त्याना सोडीत नव्हती असें मानावें काय ? राजारामप्रासादीच्याच या दोन उल्लेखांतील शब्दांचा कीसच काढावयाचा तर

पन्हाळगडावर पंतानीं पराशरगुहेंत वास्तव्य—वसती—मुक्काम केला होता व आराम-तीस समशीलाशीं मनमोकळया गप्पागोष्टी करण्याकरितां एकान्तप्रेमानें भूअंतर्गत विवरांत ते बसत असत, इतका अर्थभेद निघूं शकेल.

१२. पंतानीं नामरसायनांत पहिल्यानें स्वमंत्ररामायणाचा उल्लेख केल्यावर कित्येक आर्या मारुतीशीं इतर लाडीगोडीच्या गोष्टी करण्यांत गायल्या व मग त्याना आपण तोंवर रचलेल्या बहुतेक काव्यग्रंथांचीहि वर्दी मारुतीरायाला देण्याची लहर आली आहे. प्रथम नूतन लिहिलेल्या कृष्णविजयाचा उल्लेख केला आहे. नंतर शक १६८० मध्यें लिहिलेल्या प्रल्हादविजयाचा, पुढें कुशलवचरित, पुढें पुनः मंत्ररामायण, त्याचे पुढें क्रमानें संशयरत्नावलि, साधुसत्कार, केकावलि, चषक, रामनामार्या, व आर्यामुक्तामाला असे उल्लेख आहेत. याचा अर्थ अगदीं असाच रचनाक्रम असेल असें नाहीं, हें नूतन लिहिलेल्या कृष्णकथेच्या म्हणजे कृष्णविजयाच्या निर्देशस्थानावरूनच स्पष्ट होत आहे. पंत या सर्व काव्यांच्या समुच्चय रचनाकाळांतच केव्हांतरी खोटा आळ येऊन आलेल्या लौकिकघातक खऱ्या संकटाच्या व तज्जन्य निंदकांच्या फेऱ्यांत सांपडले होते, असें मंत्ररामायणाच्या व कृष्णविजयाच्या पूर्वार्धाच्या अखेरीस कोठें उघड तर कोठें व्याजस्तुतीच्या गनीमी काव्याच्या गुप्त हल्लयानें त्यांनीं जो आपल्या निंदकांचा खरपूस समाचार घेतला आहे, त्यावरून वाटतें.

१३. विठोबादादा चातुर्मासे हे अनंत पाध्यांचे पाठीमागून पंढरीस आले. ( मो. च. पृ. १२६ ). ते नक्की कोणत्या शकांत आले याचा उल्लेख मिळाल्यास पंतांप्रमाणेंच विठोबादादांवरहि मोंगलाईच्या जुलमी खाईंत पचून निघण्याचा प्रसंग केव्हां ओढवला तें कळेल. ( मो. च. पृ. १३३ ). पंतांचा पंढरपूरकर पाध्यांचे मागाहून विठोबादादांशीं परिचय झाला असतां, आत पाध्यांपेक्षांहि विठोबादादांचा अधिक लळा जुळण्यास " समानशीलव्यसनेषु सख्यम् " हाच न्याय कारण झालेला दिसतो. दोघेहि नोकरपेशांत कांहीं काळ घालविलेले, दोघानाहि खोट्या आळाचे मागोमाग धांवत आलेल्या संकटानीं पछाडलेले, पण दोघेहि आपल्या भक्तिबळा-वर संकटपार होऊन परमेश्वराराधनेला लागलेले, या हृदयंगम साम्यामुळेंच चातुर्मासे व पंत यांचा सांधा बेमालुम जुळला असें वाटतें. प्रस्तुत आर्याकेकावलीचें रहस्य चातुर्मासे यांना पूर्ण ज्ञात होतें, असें ज्या अर्थीं त्यांनीं या आपल्या समशील मित्राचें हें काव्य " आर्याकेकावलि नित्यनेम " धरून गौरविलें आहे, त्या अर्थीं वाटतें. या विठोबादादांना पंतांनीं पाठविलेल्या एका पत्रांत ( मो. च. शकावलि ) भारती पर्वें विराटपर्वाअखेर पाठविल्याचा उल्लेख केल्यानंतर असें लिहिलें आहे कीं, " प्रतिनिधींचें वृत्त विदित आहेच. भगवंतराव दिवंगत झाले; पुढें कसें होतें पहावें " यांतील वृत्त याच्या अर्थ काय ? मरणवार्ता असा करावा तर लगेच पुढें

तसा स्वतंत्र उल्लेख आहे. भगवंतराव शक १६९८ चैत्र वद्य १ स विटे येथें वारले. हे भगवंतराव कांहीं काळ सातारकरांच्या व कोल्हापुरकरांच्या अशा उभयतांच्याहि प्रतिनिधित्वाचा अधिकार चालवीत असत. पुढें श्री. भवानराव यांचा सातारकरांच्या प्रतिनिधिपदावर हक्क शाबीत होऊन भगवंतराव एकट्या विशाळगडचेच अधिकारी राहिले. येसाजी शिंद्यांच्या कारकीर्दीशीं बावडेकर, विशाळगडकर व कागलकर यांपैकीं कोणीच सहकार्य न केल्यामुळें किंबहुना विरोधच केल्यामुळें, येसाजीनें या त्रिवर्गावर स्वाऱ्याहि केल्या होत्या. अर्थात् येसाजी शिंद्याचें व भगवंतराव प्रतिनिधीचें सरळ नव्हतेंच. अशा भगवंतरावांच्या मृत्यूचा उल्लेख करून पुढें कसें होतें तें पंत सचिंत पाहूं इच्छितात, व ती चिंता पंढरपुरास ४ महिने व मोंगलाईत ८ महिने राहणाऱ्या आपल्या एका स्नेह्याला बारामतीहून कळवितात ! प्रतिनिधींचें वृत्त, भगवंतरावांची मृत्युवार्ता, व पुढें कसें काय होतें ही काळजी पंतानीं वहावी व त्या कामीं आपल्या एका सुहृदालाहि ओढावें, अशी या त्रिवर्गामध्यें परस्पर स्नेहरज्जूची मानसिक गुंतागुंत काय असावी बरें ? आर्याकेकावलिसंकटनिवारणार्थ उपयोगी पडून भगवंतरावांनीं पंताना उपकृत केलें असेल तर, तें ऋण पंत या पत्रांत फेडीत असावेत, असा वास मला या पत्राला येत आहे.

१४. आर्याकेकावलीच्या प्रथम पृष्ठावर जे दोन संस्कृत सुभाषितरूप श्लोक व एक हिंदी दोहरा कवीनें उद्धृत केलेले आहेत, ते तिन्ही संदर्भ एकाच वैराग्यलहरींत स्मरावेत असेच दिसतात. पहिल्यांत कोणाचा तरी धिक्कार केला आहे, दुसऱ्यांत संकटानें कच खाऊं पहात असलेल्या आपल्या मनाची थट्टा उडविली आहे, व तिसऱ्यांत मनाचा निश्चय व भावी धोरण सूचित केलें आहे, असें मला वाटतें. आर्याकेकावलीनंतर लगतच कवीनें लिहिलेल्या आशंसाष्टकाकडेहि वाचकानीं सूक्ष्म नजर देणें जरूर आहे. आर्याकेकावलीनिमित्तप्रसंग पन्हाळगडावर ओढवला. पन्हाळगडावरील पंतांच्या घरापुढें श्री. गगनबावडेकरांचें राममंदीर त्यांचे वेळीं होतें असें कळतें. पंतांना रामभक्तीची चटक या घरासमोरील देवालयानें लाविली असावी. आर्याकेकावलीचा शेवट विचारांत घेतां, कवीच्या इच्छेप्रमाणें तो पंढरपूरक्षेत्रांत सुदैवानें सत्सङ्गवासांत जाऊन पडल्यावर व त्याला प्रभुनामाची नवीनच ओळख झाल्यावर त्याचें चित्त शांत झालें असें दिसतें. उपरिनिर्दिष्ट २ संस्कृत श्लोकांचा अर्थ पुढें दिला आहे.

१ हस्तौ दानविवर्जितौ—[ सत्कार्यीं कोणत्याहि अवयवांचा उपयोग न झाल्यानें सर्व शरीराची निंदा कुत्र्याच्या शरीराला उद्देशून केली आहे ), हात दानधर्मशून्य. कान वाङ्मयाचा द्वेष करणारे, डोळे सत्पुरुषदर्शनानें विरहित, पाय तीर्थाटन न करणारे, अन्यायानें मिळविलेल्या अन्नानें भरलेलें पोट, मस्तक गर्वानें ताठलेलें, असें निंद्य वस्तूपेक्षांहि निंद्य शरीर हे श्वाना ! तूं एकदम टाकून दे.

२ तन्वी चारुपयोधारा—(हा श्लोक छेकापन्हुती अलंकाराचें उदाहरणभूत आहे.

कवीचें नांव प्रसिद्ध नाहीं; हा कोणत्याहि स्वतंत्र काव्यांत असलेला आढळत नाहीं. असे सुभाषित श्लोक संस्कृत वाङ्मयांत पसरलेले फार आहेत. त्यांस " मुक्तक " असें म्हणतात. हा अलंकार बहुतेक श्लेषालंकारानें मिश्र असतो., यांतील बहुतेक पदें द्व्यर्थी आहेत. एका यतीनें आपल्या प्राणप्रियेचें वर्णन प्रथम केलें; पण तें अन्याच्या नजरेला येतांच लागलीच चातुर्यानें बदलून आपल्या कुंडिकेला ( पाणी भरून ठेवण्याच्या काष्ठमय पात्राला ) लावून स्वतःची अब्रू बचावण्याचा प्रयत्न केला आहे ].

सडपातळ ( पक्षीं ) सुंदर. सुंदर स्तन युक्त ( पक्षीं ) उत्तम जलाला धारण करणारी, सुमुखी ( पक्षीं ) विस्तृत तोंडाची, कृष्ण वर्णाची ( उभयपक्षीं एकच अर्थ; संन्याशाचा लोटा एक प्रकारच्या नारळाचा काळया रंगाचा असतो ), मनोहर ( उभयपक्षीं एकच ), निर्दय अशा कोण्या धूर्तानें लांबविलेली, परदेशांतून आलेली, (उभयपक्षी एकच—ज्या नारळाचा लोटा तयार करितात तो नारळ येथें हिंदुस्थानांत होत नाहीं. परदेशी असतो. प्रस्तुत यतीची पूर्वाश्रमींची प्राणप्रियाहि कोणी परदेशी असावी. ) जिला नेहमीं मांडीवर घेऊन बसावें अशा तिच्या विरहानें शून्य झालेलें असें माझें हें जीवन ( जिणें ) काय उपयोगाचें ? ( असा एका भिक्षूचा विलाप ऐकून जवळच असलेल्या एका धूर्त पोरानें भिक्षूला प्रश्न केला कीं, ) महाराज ! आपली आवडती प्राणप्रिया काय ? कीं जिच्या विरहानें आपणांस जीविताहि शून्य वाटूं लागलें ? भिक्षूनें उत्तर दिलें, छे ! छे ! माझी कुंडिका नाहींशी झाली रे !

१५. आतांपर्यंतच्या मजकुरावरून वाचकाना कळून आलेंच असेल कीं, पंतचरित्रकार पांगारकर यांनीं दोन आणि दोन चार असें निरुत्तर विधान केलें तरी त्यांच्याशीं हुजत घालायलाच मी उभा राहिलों आहे असें नाहीं. मतभेदप्रदर्शनाचे भरांत कोणाहि लेखकाच्या लेखणींतून एखादाहि खारटतुरट शब्द बाहेर पडतच नाहीं असें नाहीं; किंबहुना आपला मतभेद लोकांच्या मनावर ठसवून त्यांना आत्मसात् करून घेण्याकरितां भाषेला थोडीफार नटविण्याचाहि मोह दुस्तर आहे. स्वतः पंतचरित्रकारहि तत्पूर्वींच्या पंतलेखकांचे बाबतींत कडकडीत सोंवळे राहिले आहेत असें नाहीं. वयोज्ञानानें पांगारकर जसें मला गुरुपितृस्थानीं शोभतील, तसे पांगारकरांनाहि विष्णुशास्त्री चिपळूणकरादि लोक गुरुपितृस्थानींच शोभणारे असूनहि, पांगारकरांचे ठिकाणीं त्याना उपलब्ध झालेल्या नवीन माहितीनें उत्पन्न केलेला मतभेद त्यांनीं व्यक्त केलाच कीं नाहीं ? व तो करतांना तरी प्रत्येक शब्द अगदीं धारवाडी कांट्यांत तोलूनच उच्चारला असें म्हणतां येईल काय ? 'वादे वादे जायते तत्त्वबोधः' तत्त्वबोधाकरतां मनें शुद्ध राखून शब्दांच्या कसरती कां करतां येऊं नयेत ? परंतु पांगारकरांचे बाबतींत कंदुकोड्डाणन्यायानें मला उघड लिहिणें भाग झाले आहे

कीं, मी व्यक्त केलेला कोणताहि मतभेद खोडून काढण्याच्या भानगडींत न पडतां ते डोक्यांत एकदम राख घालून बसतात! सन १९१०–११ सालापासूनच मला असा प्रत्यय आला असल्यानें, तसा प्रसंग पुनः येऊं नये म्हणून, प्रस्तुत आर्याकेकावली-विषयक विवेचनाचे वेळीं पांगारकरांशीं आगाऊच शंकासमाधानात्मक विचारविनिमय करावा व त्यांच्याजवळील दप्तरांत पडून असलेले पंतविषयक कागदपत्र सामग्रयानें अवलोकन करावें, या स्पष्ट हेतूनें मीं पत्रद्वारां पांगारकरांकडे मुलाखतीची याचना केली. त्यांनींहि उदार मनानें कृपोत्तरीं ती पूर्ण करण्याचें सहर्ष अभयवचन दिलें; पण ' कीं माझें दुर्दैव प्रभुच्या मार्गांत आडवें ' पडल्यासारखेंच झालें! समक्ष भेटून मी माझ्या शंकांचा पाढा वाचूं लागतांच, "मी माझा Evidence तुम्हांला कसा द्यावा" अशी पांगारकरांना अडचण पडली. कशीहि पायधरणी मनधरणी करावयास तयार झालों तरी, जणूं कांहीं पंतचरित्र ही त्यांच्या व माझ्यामधील खाजगी इस्टेटीसारखी वादाची बाब आहे असें समजून त्यांनीं माझ्याशीं असहकारिता पुकारली! इतकेंच नव्हे तर ' I don't feel your presence pleasent '— तुम्हांला पाहिलें म्हणजे माझ्या अंगाची आग होते, अशा निर्वाणीच्या इंग्रजी मराठी वाक्यांचे आहेर या परमार्थमार्गी पुरुषानें मला करून बोळविलें! "तुमच्याशीं पंतविषयक काव्येतिहासाचे बाबतींत माझा जो मतभेद असेल तो तुम्ही सांगाल त्या शब्दांत व्यक्त करावयास मी तयार आहें; पूर्वीच्या लेखांतून मतभेदप्रदर्शनाचे भरांत व्यक्त झालेल्या शब्दांपैकीं तुम्हांला टोंचत असलेल्या शब्दांचे जागीं तुम्हांला न टोंचणारे शब्द सांगा; मी तें शब्दांतर क्षमायाचनापूर्वक जाहीर रीतीनेंहि मान्य करतों; पण मला तुमच्यासारख्या पंतचरित्र-काव्य–विवेचनांत तप केलेल्या सहृदय व रसिक विद्वानाचें सहकार्य पाहिजे;" इतकें लीनपणें विनवूनहि सरतेशेवटीं वरील आहेर पतकरूनच मला परतावें लागलें! तूं शहाणा कां मी शहाणा हें जगाला दाखविण्याकरितां जरी पांगारकरांनीं आपला Evidence राखून ठेवण्याचें मनांत आणलें असतें तरी हरकत नव्हती; परंतु " माझा Evidence मी मला वाटलें तर जगापुढें मांडीन, नाहींतर मांडणार नाहीं ". असा त्यांनीं जगालाहि धाक घातला आहे! " कदाचित् मी आपल्या पंतचरित्राची जशीच्या तशी द्विरावृत्तिहि प्रसिद्ध करणार; मग तुमचें काय म्हणणें ? " असें त्यांनीं मला विचारलें आहे. पण पंतकार्याकरितां पांगारकरांशीं सहकार्य करून मी माझें म्हणणें कळविण्यास केव्हांहि माघार घेणार नाहीं; तथापि तें सहकार्य शक्य करण्याची जबाबदारी आतां जगावर येऊन पडली आहे; जगानें वाटल्यास याचा विचार करावा!

१६. आर्याकेकावलीच्या अर्थाकरितां आर्याकेकावलीची खास पोथी हेंच माझेजवळचें पहिल्या दर्जाचें प्रमाण असल्यामुळें तेंहि छायाचित्ररूपानें वाचकांपुढें ठेवीत आहें. त्यामुळें टाइपांतील प्रतिकृतींत संभवणारे माझे दृग्दोष, हस्त-

दोष, बुद्धिदोष हुडकायलाहि वाचकाना साधन उपलब्ध करून दिल्यासारखें झालें आहे. मानवी स्वभावाच्या व आयुष्यक्रमाच्या उत्क्रांतिचें खरें रहस्य कळण्याची आतुरता मोरोपंतांसारख्या महाकवीच्या यथार्थ चरित्रदर्शनाचे बाबतींत मी व्यक्त करीत आहें व म्हणूनच आर्याकेकावलीचा पिच्छा आज १३।१४ वर्षे पुरवीत राहिलों आहें. या कामीं महाराष्ट्रांतील सर्व मयूरभक्तांनींहि आपापल्या बुद्धिशक्त्यनुरूप मला मनमोकळें साह्य करावें अशी माझी विनंति आहे. पंतांच्या स्फुट काव्यांचा हता शेवटचा म्हणून राखण्याची बुद्धि जगत्सूत्रधारानें सुरुवातीसच मला दिली, यांत त्या सूत्रधाराचेंच कांहीं तरी विशेष धोरण असावें असें वाटतें. काशीयात्राप्रकरणें सोडून बाकीच्या बऱ्याच स्फुट कवितेवर, पंतांच्याच भाषेंत बोलावयाचें तर, चांगलेंच सूक्ष्मदृश होऊन नजर टाकली पाहिजे, असें माझ्या प्रत्ययास येत आहे. उत्कर्षांतच अपकर्षाचीं व अपकर्षांतच उत्कर्षाचीं बीजें निसर्गानें राखलीं असल्यामुळेंच या जगांतील सर्व प्रकारच्या क्रान्त्या घडून येतात. आर्याकेकावलीकालीन संकटांतच आपल्या अभ्युदयाचीं बीजें आहेत हें पंतानीं हेरलें, व म्हणूनच त्या संकटाला भक्तियुक्त धैर्यानें तोंड देऊन, सर्व जगाला वांकडी मान केल्यावांचून आपलेकडे पहातांच येऊं नये इतक्या उच्चपदावर ते जाऊन बसले ! उच्चपदाधिष्ठित व्यक्तीकडे नुसतें पहाणाराचीहि छाती आपोआप वर निघते. मग त्या व्यक्तींतील सद्गुणांचा ध्यास घेतल्यास अधिकच लाभ होईल यांत काय संशय ? तुम्हीआम्ही सर्वच मयूरभक्तांनीं मोरोपंतांचा असाच ध्यास घेतल्यास, ते कविवर्य मोरोपंत त्यांनीं तुम्हांआम्हांकरितांच भगीरथ प्रयत्नानें रचून व लिहूनहि ठेवलेलें आपलें संपूर्ण काव्य आपल्या हवालीं करतील, योग्यवेळीं आपलें यथार्थ स्वरूप दाखवितील, इतकेंच नव्हे तर, आपल्या प्रेमळ भक्तांनीं आपल्या लाडक्या बारामतींतील घरांत स्मारकरूपानें कायम रहावयास येण्याचें निमंत्रण दिल्यास, त्यांचा तो १३० वर्षांपूर्वींचा देहधारी पण त्रिकाल अविनाशी व सर्वांतर्गामी असा दिव्य आत्मा, "मद्भक्ता यत्र गायन्ति तत्र तिष्ठामि" या वचनाप्रमाणें तें निमंत्रण स्वीकारून स्फूर्तिरूपानें आपल्या सर्व भक्तांस सर्वकाळच भेट देत रहाणार नाहीं काय ?

**गंगातर्पण गांगें**


या न्यायानें प्रस्तुत आर्याकेकावलच्याच पुण्यबळावर मी मयूरकाव्यप्रकाशनसमाप्तिकार्यसाधनसंपादन करून मयूरस्मारकाकडे वळू पहात आहें, हें लक्षांत घेऊन सर्व मयूरभक्तांनीं व मराठी भाषेच्या अभिमान्यानीं ह्या पुस्तकाचा स्वीकार करावा, एवढीच "शेवटची विनवणी" आहे.

श्रीमयूरपुण्यतिथी ( १३० )<br>बारामती, चैत्र शु॥ १५, शक १८४६ } जनान्तर्गतरामकृपाभिलाषी<br>**रामकृष्ण दत्तात्रेय पंतपराडकर**

हस्तौदानविवर्जितौश्रुतिपुटौसारस्वतद्रोहिणौनेत्रेसा
धुविलोकनेनरहितेपादौनतीर्थाटनौ। अन्यायार्जि
तवित्तिपूर्णमुदरंगर्वेणतुंगंशिरोरेरेकुक्कुरमुंचमुं
चसहसानिंद्यस्यनिंद्यंवपुः॥ १॥ तन्वीचारुपयोधि
रासुवदनाश्यामामनोहारिणीतानिक्करुणेनके
नचिदहोदेवादितरादागता। उत्संगोचितयातयारति
तयाकिंजीवनापेक्षयापिक्षातेदपितास्तिकिंनहि
नहिश्रापाप्रियाकुंडिका॥ २॥ श्रीरामशरणम्
संगकरनेंकैसंतहैंसुननेकेजोपुरान। हेतरनेकूंहीनताकुडबेकेअभिमान॥

श्रीरामचंद्राय नमः॥ श्रीरामा तूं स्वामी असती माझ्या शिरावरी जा
गा। आह्मांसि तुझ्या पायां वांचुनि निर्भय नसे दुजा जागा॥१॥ बहु
जन्म विसरलों तुज परि तूं आह्मांसि विसरला न ससी। अंतर्बाह्य रू
पाकास र्व जीवीं सिवेष्टुनी असशी। २॥ कल्पद्रुम तूं रामा
ज्याची जसि भावना त साफल करी। भोगिति दुःखें जीव स्वरू
पां तूं निर्दयत्व नात करी। ३॥ सत्संगती धरावी सच्छास्त्र श्र
वणा आदरें चि करा॥ कृपासी मग मी कुडती देऊन भवसाग
री तुह्मांसि करा। ४॥ सत्योपदेश त्याला क्येंतु जी असी टेकि
ली परी तु मन॥ आटोपेना रामा लुब्धुनि तुज्ला करितसे सदा
नमन॥ ५॥ आतां प्रभो दया का मज दीना वरि करूनि कां करूणा

श्रीराम ४
१


स्वपदा श्रीमन्मानसपंडगरम्हो उगउदे कृपा अरूपा ॥ ६ ॥ ना हींस
हा मनुष्ठि या नामा विष्णु निणुया मज जगन्नित मी । त्व न्नामी मन्त्र
जे हळीस रत्सी गध्यडो न्निलो की मित्र त मी ॥ ७ ॥ लपणा जिनि नाम तुजें ब
मुखवीन राहो सदा हि मधुर तम ॥ रत मन जे मुनिचें ज्यांचें गेलें
सम कां दूरतम ॥ ८ ॥ उद्धरिला जो पापी पुत्राभिधें नाम घे अजामिळ तो ॥
तारीं हा हि जन न संसारीं मेंहि जरी परी तुजा मिळतो ॥ ९ ॥ अपराध कारके
ले परि आतां हात जोडिले स्वामी । करुनि दया तारावें आवडि वाढो सदा
तुझ्या नामीं ॥ १० ॥ सेवक तुझा [illegible] श्रीरामा राघवा सख्या [illegible]
[illegible] दास तरि हा होतन नसें मी उदास आयपातो ॥ ११ ॥ संसारसा
ग [illegible] करुनि सोचि सिलव इतात ॥ व हतां तरीय नामें देतो दासांस तारुन
[illegible] ॥ १२ ॥ सा [illegible] सें औदार्य तुजें प्रभुत्व करुणाकरत्व ए को नीं । आलों रा

रणस्वामींजोडुनियां समस्तकीदोनी ।१३। पायेंमजदी नालारामा
लोटूंनकोच्विबाहेर । ऊद्धरिलेबहुपापी याविषयींनिरुत्तमा
श्रूर ।१४। कृपाकीतस्यांनश्रीरामा तुजजरीनविसरे तों त
रिभयनसेचिकाही सारा ही कृशतापहिसरे ।१५। आ
म्हासिनाममात्र कृपाळुश्रीमाजिनावहीठावें । गावें तींचित्रमें
स्त्रीविकुंदरामातुवीहिमीठावें ।१६। केवळभजनाचि कृ
ड जरिठेविसि छलरिनसरे थारा । आपलियाधोरपणाव
रिकेनि हीनहालारा ।१७। स्वामी आम्ही दुर्बळ तरी र
घुवीरा समर्थ यासाठीं । देउनि अभयकरातें नेस्वस्थाना
सिझुऊपराथाटीं ।१८। धावसमर्था सद्या सर्वकामा जि
डुडलसे गाय । निकरस्याधर्म ज्ञाकौतुक अद्यापि पाहसी का

श्रीराम:
२

या ॥१९॥ करुणाघन तूं माथां जाळिलासे मज म्हणा त्सम बळवा ॥
वदि न करि ती लोली उदास हें योग्य तूं जनस्त कृपाळवा ॥२०॥
संकट वारुनि रामा निजगुण कीर्तन करावया योजी । आपलि
या थोर पणें रामा मज लोकांत कीं करीं मोजी ॥२१॥ तूं जरि न
पावसील तरि याचा हें रे कटीत मीं कवण । आवणा रूं करूनि
हे विनती रक्षीं भक्ताप दुःख वण ॥२२॥ सीतापते रघुपते क्षिति
पते भूपले वदान्यपते । हूं आदि कीर्ति लुटि या कीर्ति पुढें तुझ
सर्वथा लपते ॥२३॥ सोडविले सुर सारे रावण कारागृहीं तुं नीं दे
वा ॥ जेलसे स्महि स्याची करीलहो तेल दास्र हें सेवा ॥२४॥ देवस्त्री
ही दासी केल्या हो त्यादशाननें दुष्टीं । त्या सोडवूनि स्पीं सीं चित्तं
कल्की कुवीं चिसीं लुटी ॥२५॥ गंधर्वं कुज गावे ते त्यापांन्ता बिल

निजस्तवना। लवनाम धारकांतें सोडविलें त्यां करूनियां अवना ॥२५॥ ते
स्वरणार्चन तत्पर रघुनिवनवासी दिशानन त्रस्थ॥ त्यांस सुखविता जाला
प्रभो तु जाअभयदान पटुहस्त ॥२७॥ बंधुकृत सुध्य कर्मा बिभीषण भ्राज
रावणें दुःख केला॥ येतां शरण तुं त्याती हृदयी स्वभुजें धरूनि आवळि
ला ॥२८॥ वालीनें स्त्री हरिली आपणा सिया त्रासें। सुग्रीव शरण
आला तुज तो त्यां रक्षिला अनायासें॥२९॥ ब्रह्मादिकां सि दुर्लभ पद
रज ज्याचा अलभ्य लूटे ऐसा। शबरी वर्णी दिधु णीं नबरी लिस पावला
सि लूं कैसा ॥३०॥ गुह नाम निषाद पातीस्व भक्तिसंपन्न त्यास बंधु
पणें। त्यां मानिलें दयाळा दासांचे नाशितो शितापपणें ॥३१॥ चर
णाविलोकन तत्पर वानर आत्तांत राघवा गणिलो॥ साधु द्विपीजे जे कु

जे

वंत्यांचे समूळ हीरवणिले ॥३२॥ गौतमपत्नी शिळा होती पापताप
×तरु× शापाही ॥ तेउद्धरिली जैसी मज निज करुणा लवें तशापाही ॥
॥३३॥ रक्षो भीती पासुनि गाधिज मरवरक्षिला जसा राया ॥ होसि
च तसा संकट मज दीनाचें हि आज सा राया ॥३४॥ दंडक वन खळ मर्दुनि
निर्भय केलें जसें प्रतापानें ॥ गत भय हारी प्रकरीं जाला बहु विक
ळ विप्रतापानें ॥३५॥ आलों ह्मणुनि शरणा तुज सहज दयेचा चि पूर्ण
सागरल्हं ॥ तुज विण कवणा हाईं तापोपशमार्थ आज सांगरत्नें ॥
॥३६॥ तूं बाप माय बंधू धणी सुहृन्मित्र जानकीजाने ॥ करु निर्दया
विलया लागि तिस त्वरें संकटा समाज्याने ॥३७॥ श्रीरामा सुखधामा
पावन नामा स्वभक्त विश्रामा ॥ कामारिगीत कीर्ते करुणा मूर्ते नको

स्युज्जूं आस्तां ॥३८॥ रामा धांव रघुपते धांव विभो धांव राघवा धांव ॥
कौतुक काय पहासी आळवितां या परी तुजें नाव ॥३९॥ नाथ तुजें नाव
त्रियासंसारां भोधिलाल शयासी ॥ तें हृदयीं धरुनी हीं मी कां अद्यापि सां
ग आयासी ॥४०॥ या दीनानें आतां पसरावा पदर सांग कोणाला ॥ तूं जा
नतापवत्सल लपोन जाउनि काय कोणाला ॥४१॥ जरि दास परानें
हा अपराधा ॥ वीणा रंडिला राज्या ॥ हें अम्हा ध्यावें लुज त्वां नृपनीति तु
झी मनीं विचारा ज्या ॥४२॥ तु जरी न बंधु म्हणतो म्हणउनि मी दीन मा
रिलों हा का ॥ हा काय दीन लटि का जे कां निज बंधुता तुझी टाका ॥४३॥
दीनास संकटीं जरि सहाय होशील योग्य हे हूतें ॥ आळस न करीं मा
ज्या स्वरक्षपा तें सुकीर्ति हे तूतें ॥४४॥ दीनानें किति सद्गुण हीनानें वि

२


नबिलेंतुलाआजी॥बाजीवहानदेगानभोउपेक्षाकरुंनकोमाजी॥४५॥
हेक्षतनुजलाकळतेंहृदयस्थाराघवाजगज्जनका॥जनकायतत्वजाणे
प्रभोउपेक्षाकरुंचिआजनका॥४६॥सर्वांलाभाळुनिबळलाभअसेत्वत्
दोबुरुहभजनीं॥भजनीलिहाभजलांसंकटनपडोंरिजेचिअभुभजनीं॥
॥४७॥अन्यायक्लेशनसत्तांगांजितिउद्धरहेंतुलाचिकळो॥किकळोनिसं
गतांतुजयादुःखेंनमनआमचेंविकळो॥४८॥कळिमाजिसुद्रनृपत्रे
जेसिदलीधनार्थबहुताप॥दापअसकळोमीनपाहलीधर्ममाथकींबा
प॥४९॥नृपरिसरोचापलिशासनकर्ताउपेक्षिसीकांहे॥सांहेउगेंविह्व
णसीमाझेंबळयेथकायतेंपांहे॥५०॥खळजेहेसत्तीडकेयांचीतुजक
राघवाभीड॥त्वद्दासतवसमक्षचिगांजितियेणेंकसीनयेचीड॥५१॥
सिंहासमक्षत्याच्याबाळाजाचितीलजरिकोल्हे॥नरिमगअसास

२८

पंचाननम्रगपतिकोण जाणमानोळि ॥५२॥ अपराधीसेवक तरि हेंडावास्य
मिनें चिंहें भुक्त ॥ उक्रम्भवण करूनिथांकरि मजलासंकटातुनें मुक्त ॥
॥५३॥ श्रीरामचंद्र राघव रघुवीर रक्षसी क्षिमाळवानलुळा ॥ संकटशे
रुनिघडवीं माज्या हातूनि या महाभेतुळा ॥५४॥ एकांतीं लिन्नामें गायिन
मधुरस्वरें स्थिरस्वांतें ॥ संकटवारुनिया देहें मज वर हा नेकांकांतें ॥५५॥
या संकटा बरोबर वारीं लोकेषणा हि अनिवार्य ॥ ह्मणा जे दारा सूनुज
नास्त्रा लोभ क्रयांत रत कार्य ॥५६॥ अन्ना आहन देतें हुंस रें बा कोण
सांग विश्वास ॥ ह्मणतां निआयुरन्नें प्रपचतिप्राद्ततेय विश्वास ॥५७॥
सद्गुणकीर्तन करितां लज्जा हे पापिणी धरूनगळा ॥ हे लाटकांतका
हा परमार्थ इप्पें चिबुडविलास गळा ॥५८॥ तुजला धरीन हृदयीं ह्मण
ते लज्जा पकेल संवाट ॥ दाटल प्रेम लयीं शमेल ते लाटकातसी वाटे ॥५९॥

नजा

श्रीराम:
५


स्थ करूं सतील लें हीसो सायास रुनशी कला द्यावी। त्वाहीन मस्तक
तुझ्या पदीं तुजी शक्ति आत्मविद्यावी। ६०॥ त्व कृपा कीर्तन करि
तीस्तैं भादिक अह भाव उपजावे। जावे अनात्म धर्मक्रोधादि
मनोविकार वर जावे। ६१॥ हा कामक्रामरायाकुर भावा कल्क वक्ष
तूं सांभा॥ ज्ञाता सर्व गलभ प्रभु आत्मा प्रिय निर्मिमित्त्य साम्या
६२॥ मन हें विकार इच्छी की आली सेवणें तुजपाय॥ तुजवांचुनि
इतरों व्यापन जनीं मजलागि होय फळ काय। ६३॥ केलें म्यां मनु
जें वैं आजे ववकु वादु कारही झाल्यों॥ धरिले अलाप पाहुनि पुन
राप तुजलागि शरण मीं आल्यों। ६४॥ भ्रम मर्दील पाहुनी क्षांश्रम
हीन क्षुद्र विचार किती कीजे। त्वीची तशा चिल्ला कीं सेवा तुजला नआ
घातों कीजे। ६५॥ दुर्बल सनी धर्म रहित निरक्षुर क्षुद्र त्वी सिमीं न

मनें।करुनिश्रमीचजालोंआलोंतुजशरणआजदीनमनें।६६
रामप्रभुजीमाताआल्लातुजशरणस्वासिराज्यपद।लीकल्वेंअर्पियें
लेंकोणनवेंदीलतेंतुजेंचिपद।६७॥शरणांतरीतुज्याचेंनमनकरावें
तुलाचिसुज्ञानें।गावेंतुजेचिगुणवासेवानेंतुजचिमाद्दगज्ञानें।६८
म्हणवुनितुमच्चेंनामाचिराम मुखींसदाराहो।सज्ञानहीनदीनभ्र
सन्मतीपुनिनीअताराहो।६९॥प्रभुजीतुमचेंसज्जनउद्धारपणवर्णि
तातिबहुसाल।साल्सतामभ्राणीधरितींवाढलीसवेगवसाल।७०॥
आकळिलेकुनिमींधीप्रभुआकळिलोंनिठुरतुउरवाळी।आकळिनिवा
कळिनिमातेंआळसटाकूनिधांवकुरवाळीं।७१॥पाळकलेंविघ्नांचावा
ळकसातडिपसारिलेंचोंमी।बाळकराळकोंनितरकाळकेसाचारिसी
नहास्वामी।७२॥हेंकरुणाघनरामामीचातकपसरिलेंअसेआस्य॥

श्रीराम
६

नामामृतकमानमिकेतरिलोकींफारहोतसे हास्य ।७२। विश्वैकमान्यद
नारम्प कौसल्याबीरसू सती धन्या ॥ तत्कुनतैं रघुपते उपमा तुज त्वा तुजी
नसे अन्या ।७३। ज्ञातांहूं दातांहूं ज्ञातांतहूं बीर धीर भर्तातें । जनपीडाहर्ता
तूं श्रीरामा मुख्य विश्वकर्तातें ।७५। आलय परद्रूपास इक्ष्वाकु दक्षिणअं
श्रीपास घवा धाम ॥ जलदच्युतामल कोमल कालिमल हर रम्य मनोज्ञ
रघुराम ।७६। सुरवर मुनिवर नृपवर कृतस्तुपागपावरपरमसु
खसदन ॥ त्रिभुवन सम वनपद भुजभेवरद पम शमन रुचिर
तरवदन ।७७। ऐसें गायिन तुज त्या हामा जो कामपूर्वी वरद ॥
हरदासांचें सीं कद रामा भवसिंधुमग्न जन करद ॥७८॥ स्तुति
करूनि तुजी तुज त्या आम्हीं अज्ञानकाम वारिजवें । गाकुनि अ
मृतगुणातें हृदयींचे ताप आपुले विझवूं ।७९। ज्ञापमान्चे तसमु

निपराशरव्यासनारदर्षिशुकीं। गालांगुपापारनसेयांत्याचेथीत्व
कोपाअन्यलुकीं। ८०। परिभावें गुणागातांप्रसन्नहोतोसित्रूअसें
ठावें। जालेंसज्जनसंगेंप्रेमकसेंतेंमनांतसाठावें। ८१। ब्राह्मणपणें
नरिझसीमूर्खपणेंनरिवजसीभलेह्मणती। प्रेमकसलाहिआसो
करिसीत्यांचीस्वसेवकीगिणती। ८२। होसीप्रसन्नभावेंदेसीसर्व
स्वआपुलेंभजकां। सत्संगींबसलोंमींनकळेइतुकेंहिराघ
वाभजकां। ८३। संतांच्यावदनेंमींआयिकिलीबातुजीजयींचरि
तें। त्यजुनिविषममनकेलेंनिराबयागुणसुधातयींचरितें। ८४
साकेतपतेरामानाकेशकुतात्वदीयगुणगाती। हाकेसरिसाये
बुनिहाकेवकदीनकुधरींआती। ८५। त्यापरारधराधीराआप
त्रस्तासिभजनकांविसरूं। यापरमसंकटींमींबापतरउज्यापुढेंकि

श्रीरामः
७

तीपसर्हे ॥ ८६ ॥ आधार तूं जनांच्या बाधा हरणार एक तूं दक्ष ॥ सा
धावयाचें श्रम तें बाधांच लुल्लो न मस्तक ली लक्ष ॥ ८७ ॥ जळदनि
भा बळ सिंधो रवळ मयनासूर्य कुळमणे क्षपणा ॥ मी विकळ
जाहलों व क्रीकाय तुजें लोपले दया क्षपणा ॥ ८८ ॥ मज असि पण मन्त्र
वरदावर जरि करणा करुनि देतीच ॥ तरि मांबली सज्जन मनें
जवाला अश्रीचिये चीळ ॥ ८९ ॥ निश्चतु जाहालीं तूं नामी ले नाम
साधुच्याचिमुखीं ॥ तत्सौगंद मला मग गुंतेनामीं कदापि लक्षसु
खीं ॥ ९० ॥ लक्षा परापरखडले रक्षावें परिकुळा गरया आलों ॥
दुःखाख्य रहुरचिंत्या दुःखामीं मग्न संकटीं जालों ॥ ९१ ॥ संगधर
निविषबांच्या भोगा चिमनन पावलें परी न मिटे ॥ साधु समागम भे
षज साधु निदेवी ळतरि न्वमो रु फिटे ॥ ९२ ॥ चित्त अनावर रामा वि

तस्त्रीपुत्रचिंतनीं चिरते ॥ मधुलिप्तक्षुरधारा चाटीतजीभतत्क्षणीं चिरते ॥
॥ ९३ ॥ निपटुनि विषय त्यजितां सुख मुखदृष्टी पडे अडताप ॥ हें सत्य अ
त्युग्र घितले थें संताप जे स्थळी व्याप ॥ ९४ ॥ तनुनिर्वाहा पुरता संग धर
निर्हारि अर्थ मज घडला ॥ सावध लक्षीं निसरणी मार्गी विवरूनि शांत
सुख पडला ॥ ९५ ॥ शुध्द चरित्रा रम्या शुध्द पदु सुजा मनुष्य से व्यपदा ॥ उध
वनि धे रम्या कोउ धूरिं मजलां न मी न तूं जसदा ॥ ९६ ॥ भार्या प्रियस खरि
ना सर्व जगत्पालका अगा बापा ॥ पर्व सुधाकर कर रुचिर सर्व हर स्मित नु
खा हरी तापा ॥ ९७ ॥ नाना भये घिल्लोकुनि पावतसें कारकार तनु कंपा ॥
शिर हे विलें पदावरि उध्दार नलावी करीं तिम अनुकंपा ॥ ९८ ॥ मन हें घात
कवडीं विषय व्याळास वें करी क्रीडा ॥ पीडा हि पावतें परि सावध नाहेन
तें धरी व्रीडा ॥ ९९ ॥ या कोटग्या मनाला विषयी पाकाय वाटते गोडी ॥

रखोडीतुज्याप्रतापा वीचुनियीराघवानेहें सोडी।।१००।। बऋसंरख
चपळमर्कटकटकें आइकेंतयतेंत्वीं नीट।। वीटनेंधरि ऋगिल
तरीमाझेंमन कायतुजपुढेंधीट।।१।। श्रीसद्मींपदपद्मीहो
यिलमनर्भृंग दारववुनिपाहें।। लब्धसुऋलेभीविषयत्यजि
लकसें बऋसत्तष्णासहपाहें।।२।। देऊअभयदानदेवासेवार
तमींतुजाचिमोभार।। त्यजितांअनादरानेंकरीनत्लोकोंनकार
वोभार।।३।। त्वच्चरणाराधिनमींजाणेंनाहींचत्लेचाहीइतर
नामचिगातांयेणेंप्रसन्नहो वूनिअभयतूं वितर।।४।। श्रीह
प्रसादमजवरि ह्मणुनचिवदनासियेतसेनाम।। हें जरिमुरवा
नयेतें होताकैंचामनासिविश्राम।।५।। विकळमनामीजें कीं
वदत्लोंत्याचीकरीक्षमाआर्या।। जे सहून रक्षिलेदक्षिणहृपा

लुचि भाईं लुंचन ताचा वाली ।।६।। दुःख वनरूचे सुख रूचे कर्में कि
रितीं विवेक हीन रूचे । अमृत फळ कसें देति लपदल्ल यपाणी स्व
कीय विषतरूचे ।।७।। हें सर्व सत्य तों परि जों परि तुज शरणपात ली
नाहीं । आतां थोर पणा सचि आपुलिया मात्र राघवा पाहीं ।।८।। गं
गेला जाकुनियां भी चरबरीच्या मि ळेजयीं वाळा । त्यिं तेन स्लणमा
गं हा कश्मळ ग्रीवत सेधरावा ळा ।।९।। तूं करुणाघन रामा पसंत्क
मयूरासि तूं चि सुख देत्री । सन्निधि असो नि पापा न करीं याकिं श्रीराम
करासि पर दृष्टी ।।१०।। विश्वंभरा भरवसा आह्यां कीं करासि फा ९
र तुजा ।। जें या म्पतें करावें दीन जनोद्धारणे कदम्स तुजा ।।११।। हा
दीन राम नी सनत्स कोरतूं चीं श्मारमानाथा । द्दीचि तस्वास्थ्य बेरंगा
यीं न लुज्याय त्रौंकिता गाथा ।।१२।। बहु गोड गुण तुजे ते एकावे आ

रें स्वयेंगावे। यावेगळे मनोरथ असती ते कायतूज सांगावे।१२।
सोमित्रे मजविषयीं तूं आर्य त्रास ना करीं कांहीं। भक्ति तुजी
श्रीरामीं बऊ कापिलें सत्य नरहि ळलो कांहीं। १३। श्रीभरताराघ
वपदलाभरता अग्रजासि तूं विनवीं। मज दीना हनार रघुनि साधा
वींस घनश्याम असीं वनवीं। १४। शत्रुघ्ना संगव ऊन नत्रा तुघ्न
राघवासि हें कळवीं। माझी भवभय सारें रामा निदेशें करूनि
यांपकळवीं। १५। मातसीते बायी श्रान्यो चैन्यपति स्नातु वीओं
गे। सुखदुःख तुला नाहेंमज विषमीं उचित तें स्वयें सांगे। १६।
भगवन्त हनूमन्ता धो साधो यश प्रसिद्ध तुजें। मजसाटीं
रामाच्ये पाय धरीं निजानुरीं प्रताप तुजें। १७। आगं रिपुव
ळहर्ता आऊ वेळे ब्रह्म गोळऊ हर्ता। तूं मारुते पुनर्भार्दे वीर
घुवीरस वनस मर्था। १८। अद्भुत चरित त्रिजगीं लोको धार

श्रीराम
१०

र्भकारिंसुखेंविभुजें ॥ तेंबुझचरित सखेंबालांहीकेलंचरित्रतें विभुजें ॥२०॥म
जहूनि भक्त माझा सम यहिं आपणा सवांच विले ॥ त्यांसंकटीं असें शुचि जिनास
कयुनिस्वतलस्वचविलें ॥२१॥ मज ति चे स्वरसक भक्त भले हे धरासुतासाधी॥
त्यांकेलियांसवेिलें हाकुराखोल्लागिसुचविलाबोध ॥२२॥ तूंतोराघवराघ
वलाहुतुझ्यांतत्यां न से भेद ॥ सप्रेम भक्त देवचि विधु प्रसादांसे मान हृद्भेद ॥
॥२३॥ आम्रास महूधरणीं लेशानको सुलभु मीं सर्दाघि रज ॥ द्रोणन क्ष अचलें
नक्षे सहस्रमितज्यालतुल्यसिंहगज ॥२४॥ जेपतुर्ष्मसिंधुनि मज पहारू
पास्तरसाई दृष्टीतें ॥ हत निर्मित स्रष्टानें शरणागत म रु सुधोघ दृष्टीतें
॥२५॥ दृष्टिमृगीहे तुमचीराघवपदराग मो हिताजाहे ॥ मजवीतराग
रंकानिजसुरवक्षरमंगराकसीपाहे ॥२६॥ मनमात्रमलाअणुल्लास्मरो
तरींनेरुद्याचिमध्यनें ॥ अणुपरमाणुचितारुह्स्पादिंचाहेंकिंजेकुशल

नि

रत्नें ॥२७॥ मी विषयांसी परवश घरोघरीं मर्कटासम आम्ह गणीं ॥ म्हणु संगि
तुल्य भावें पाहे न तरी दैवें जीं गतासु गणीं ॥२८॥ सेना सिनरी भेरोजड मे र
करते तुम्हां कुलीन उणे यभू तीं वद्धसदयहृदय पावतीती सहज अखिल आ
भरवुणा ॥२९॥ भूतें भगवंतें चिति संत चि परियों तकिति निजीं लग्न ॥ हि
तीं गृहस्थ वर्षे परिसम्यक् ० न्यास परसुखीं मग्न ॥३०॥ कोण्ही श्री मन्ना
रदशुकादिक विमुनि पराशर व्यासी ॥ हरिगुणसुधा कपाही जिनसिं
निं पाउियलें सुह व्यासी ॥३१॥ यांचा तकलसांचें सार स्वल तें चि जीवन रा
ज्य ॥ इतरहि जीवन इतरां हे भीक बरीन को वुचें राज्य ॥३२॥ संतीं पद्धित
पंतीं अंतीं रवंतीं तच्चित्त याधरिजे ॥ कीं रे वास रसा निरसन पाहतां संके
२ प्राणाउ धरिजे ॥३३॥ हेचि अविद्यालंकांतेथ अहंकार दशमुख सुद्रा ॥ या
चे दहन विखंडन जड जीवोद्धरण धदु सितसमुद्र ॥३४॥ संत भगवंत


साचेपरिभगवंतायरीसहियोर ॥ हेआंगेजं धाचीयष्टीहोतातिथारबहु
घोर ॥ ३५॥ कलिमाजिपुंडरीकक्षेत्रीसिनपक्षकातिकाबाढीं ॥ संतजन
तरसपाजुनिक्षणतीघेहेभयारहावाढीं ॥ ३६॥ नलिमणिचुलिभावित
पीयूषरसक्षद्रभसन्नवरा ॥ तापशमित्रपिंगमेचितरमेउपरमसुसेव्य
रवरा ॥ ३७॥ वैकुंठविहिविठ्ठलपद्ममंडितपुंडरीकसुक्षेत्र ॥ तेथेंहरिगुण
कीर्तिनयथेंहीतेचसाधुजननेत्र ॥ ३८॥ दक्षतपस्वीपित्रपदसेवनस
र्वस्वपुंडरीकमुनी ॥ पित्रभक्तिपूर्णकामश्रीरामाझावितोउभाकरुनी
॥ ३९॥ गुसेकुवासह्रियापठावयारामपातलाबहुधा ॥ बेणोप्याच्लेहि
सुधासुचल्लाहितमार्गहासुपाचबुधो ॥ ४०॥ आपपासवाघेउनिपित्र
र चैर्णीजोडिलीपुन्हाबडी ॥ हापित्रभक्तरघूद्वहकरुनैक्षेबुधिनाथ
केवडी ॥ ४१॥ रामत्रयत्यामध्येमध्यमतोराममीअसेंहातें ॥ धरुनीनि

श्रीराम:
११

तंव धिंवाशार्वे रघुनाथ मेंचे पाहातें ॥४२॥ हा नियद्द छालस्थें करास्मर
मजधरान्तु सिद्दाती ॥ मगमी आंधि गायाउभा चहें सु चविनीबुधी
व्राती ॥४३॥ मध्ये करमी सिपतां नरलोकी सक्रियासमाधानें ॥ क
र्नी अव्होर कशाभूमो आनी स्थासखियाहानें ॥४४॥ विरहें करक्रियां
व्याकुकत्वतां पूर्णकां मतासु चवी ॥ करुणोक्तें हादीनप्राधारी हें
मुख्याणीं करवी ॥४५॥ तें तां येथें वि उभा आंतीं जाह्यो सिठेंवसी कों
हो ॥ तरिजा पस्मार रव्याती पावेंहि पता नवोल्कतां आटें ॥४६॥
भक्त भक्ताचा भीपर मसु फलो जसं जसें कळवी ॥ कटिवरि करठेउनि
भानुमारवरा तकेहानदु दर्वेवी ॥४७॥ विषय पहाता सादर तरिजा
लोसणु क्रियांउभाकरता ॥ हि तवां र्थिहपास्तवकरुणाब्धि सो
मला मलाद्दिसतां ॥४८॥ भी सा सी आसर्वे अरवंडदंडायमानहि

उभा

घनसें ॥ शरणागतास जे दें ऊभाउ तों कळविलो स्वतत्त्व असें ।४९॥
प्रेमळ भक्तों हीं भजन ते दावी कड कडूनि पोट भरी ॥ कटिं कर ठेवुनि भीमा
तटीं भुक्ति मुक्ति धीन हरी ।५०॥ होती कैं वत्स्याची कळिकाळीं लूट जे
असी न कधीं ॥ मागें हि गो प्रतारीं जाली सरसी तए कवे कतधीं ।५१॥
सर्वस्व हा करि केलें पान्नी सेत्रीं स्वमूर्ति सर्वस्व । नसरे अर्ने तत्लुटिती
सध्न न सन्धीं न तुटिलसे निश्च ।५२॥ हे इंद्रनीळमणि ज्या कीर्ति
रसाचीच बोतिली मूर्ति । मन तृणकण लिगटतसे तुळी बरी पा
हिली खरी पूर्ती ।५३॥ हा विठ्ठल ठकठकिले ठकठक पडले ठ
कीं सिजें हरिलो ॥ नाम च्वि देलो दाऊनि निजाध्ये जन सें चिताध्ये सें
हरिलो ।५४॥ यासहि नामा ठकडा पेट भगयास ठकविलें त
पें । सकुणागायमुनि पुर्णे वधियला कृष्णासार साजे पें ।५५॥



ऐसे [illegible] तत्पर सद [illegible] सीतपर्ण लसे थवे ॥ ते स[illegible]
मुमुक्षु [illegible] सि [illegible] नदांवे ॥५६॥ ल[illegible] वरी करुण श्री
मत्सी [illegible] त्याच्या जपीं [illegible] निरत सदा [illegible]
[illegible] मुनी ॥५७॥ हे भरत सुमित्रात्मज हे सीमेमाय [illegible]
[illegible] ॥ सिक वा साधु जनाला [illegible] करा
विनती ॥५८॥ [illegible] मुनि मुख [illegible] पासेव [illegible]
[illegible] ॥ गुरु [illegible] सजनीं [illegible] वीण सवीया
[illegible] ॥५९॥ श्री मंदिर इंदीवर [illegible] अमर [illegible] सिद्ध ती [illegible] ॥
[illegible] सिगम सरयू निकट [illegible] आराम निहि नपाणि कटी ॥६०॥
औंको दसनि [illegible] संग भावि कजन सव भाग्य भर [illegible] ॥

सेउभाअुभाग्रायअ्रायनिवृतनितीबर्बिबहुरिडोक्वां।।५६।।
निजपदजलजनिजकजनजगीतबरूपूज्यहरिसिकीं।।त्रि
वते।।प्रत्युत्यानेदिलेसेमुकतकेपदअशामती।।रीघते।।५७
श्यामळविमळज्योतिस्वयंप्रभाप्रकटचित्रतमहरिते।।करि
तेंतर्कअसामनपर्तेभारामतीविलोकितीहरिते।।५८।।ता
पत्रामतमनानोयातेजेंहेंविलक्षणप्रकट।।वर्णेसुनीळ
उज्वळमनश्यपर्तेभासिजीवमीनिकट।।५९।।हाअवधूत
विलक्षणसपरिग्रहआणिरवीउदासीन।।याणेंयासहस्त्रे श्रीराम ९२
त्रींनाम्याचीसोडिलीहिदासीन।।६०।।हाबाळकनेसा
चावसुदेवाचाखराद्न्ग्रारथाचा।।कोणेकाविरळयानेंवद
तीतत्वज्ञपतिअनाथाचा।।६१।।हासुमगाजमनथुंबकवि

ह्रपचिंतामणी। अव्यक्तमणी।। स्पर्शमणी अमृतमणी सुर
मणिचुडामणी मणी इंद्रमणी। ६७।। हा कटअपादपाचारी
पातकसलिलसितकोळका सोपा। याच्या हृदयीं आरे खोंपा
घेतलाति हींससुख झोपा।। ६८।। गोरानंदयशोदा गोरीव
सुदेवद्वारकी हि गोरा।। तत्सुत काळा कीं तूं भोळे जन ठकवि
सी हृदयचोरा।। ६९।। काळा की हि कळलें भजत्लातें नीळ
कंठ कंठमणी। तो ब्याघ्रीं वेढिलें तुज पुंडरिकानें रिझो
नि साधुपणीं। ७०।। तूं सोयजाणसी बहु दीनांचा सोयरा
खरा सुभगा।। नारिवासित्वाज जनाची हें सें सारील जोडि
लें शुभगा।। ७१।। जीवाभ्यारीं केरूपा श्रुतिनिष्ठी चो हुली
डबागविठी। वर्षांतरें कळिंत बहु जन तारिसि साधिनीं


भागाविरही ॥७२॥ तूं सज्ञान शुकपंजर कीं जर मपावें न्रामप्रिय
तें सपद ॥ खळ न्रामन बळ न्रामन न्रारकर हरहर हरहदय
हर्षविरक्तपद ॥७३॥ भक्तमयूर दयाघन तूं रामा तव पद्याते
विश्रामा ॥ स्नाकरि गनमन तुजलागी तुजलागि लीनानिज जनमा
गुणग्रामा ॥७४॥ ॥ इतिश्रीमल्लक्ष्मणान्नमप्रसुन्नवामसमरपण
तें दिल मल्लमस्मरकें काव्यलीं ॥ ॥ श्रीरामपदार्पितास्तु ॥

तवपादसरोरुहीं स्वचित्तभ्रमरातें रसचारवरूनिगोवूं ॥ तुजम
कतुजे सदेव गातीम्मगआलीं गुणगीत सन्तके होवूं ॥ ॥ मजबाव श्रीराम
तसेसभाग्य मोठेभगवन्त कतयी लयी जुडावें । तदधीन तुज्या २८
पदाब्जसुखेंचा करणीरतनाम घेंबुडावें ॥२॥ तुजवर्णीती
सैंतसी गम्मुतक प्रकृति प्रेम कल्तरूपी झिरावें । तुजियाग्रुपासा

गरीलमाजें मनरूसें ध्यवमाधवाविरावें ।३॥ गमलें भगवज्जन
प्रसंगें मजदाकुनिगरुडादिकोपनजावें । करुणावरुणालयामु
कुंदातुजलासाद्रसर्वदापनजावें ॥४॥ तुजत्वारघुनाथरामा
नाथप्रभुजीयापरिनित्यआळवावें । मनत्वीचळेहित्वदंघ्रि
पद्मीं जडत्तीनक्षणामात्मत्वाळवावें ॥५॥ मनहेंविषयींकुडी
च घालीविषहें जाणोनिसावरींविटावें । नवकीर्तिउदारका
मधेनूतिसमी तोकुनिवारासदेचिटावें ॥६॥ तुजएकअनेक
रूपरूपदीं घटतोमार्केअवोपरीपहावें । भजकार्पितस्कुल्क
प्रादुराजनकुळेसीदामनिरीरींसदावहावें ॥७॥ त्रिजगान्मयनम
प्रोदेलत्वकुवारीछिसराजस्यीनमावें । स्तमरत्वधरूनियां
रमावंस्वसुरवेंत्यापुवनत्रयींनमावें ॥८॥ इत्थासंसाहक्कं ॥ १


मधुप

मयूर बारामतिचाच होता । असा धरा हो ! अभिमान मोठा ॥
तत्स्मारकें सर्व कवींस आणूं । काव्यार्थयत्नास ठिकाण जाणूं ॥ १ ॥



☞ हें छायाचित्र रिडयूज्ड स्वरूपांतील असून अस्सल कागद पाठपोट लिहिलेला ४॥×९॥। इंच आकाराचा आहे.

बारामती स्मारकयोग्य जागा । स्वप्नेंच हो मीहि पुराच जागा ॥
ती द्या मयूरास्तव स्मारकाला । साष्टांग घालीं नमना जनाला ॥ २ ॥



श्रीरामः शरणम् .

# बारामतीकरांस उघडी अर्जी

' बा ! राम तीच आहे ' वदवी बारामतीस तो कोण ?
बारामतीनिवासी जनांसि मति हीच एक सोडो न. १
बारामतींत आणी तो राम मयूरकविच जाणतसां,
बारा मतींत हिंडुनि येतां मज एकमतिंत बोध असा. २
देखा मदात्मचित्रा न्याहाळुनि सर्व, तरिच देखाल,
संकल्प कोणता मज चैन पडूं देइनाचि, दे हाल. ३
श्रीमन्मयूरकविच्या केव्हां जातील कर्मभूमींत
श्रीमन्मयूरवंशज तत्स्फूर्तीनेंचि देह होमीत ? ४
मी तुमचा गांवकरी अपुल्या गांवांत इच्छितों वास.
जेथें मयूर ठेवी निजदेहा, तेथ इच्छि देहास. ५
आहे मयूरसंपादितगृह तेथें, जरी नसे कबजा;
संकेतचिट्टि आहे मजजवळि, पहा, म्हणा न हो ! " कब ? जा." ६
मुदतीबिनमुदतीचें भांडण भांडावया न मी राजी;
जनताजनार्दनाच्या दरबारीं देत ही असें अर्जी. ७
जनताजनार्दनाच्या दरबारीं सर्वही समवतात;
आग्रह करूनि लावूं कोणेकाच्या गळ्या कशी तात ? ८
द्या द्या हेंच म्हणत नच, अखेर मोक्षाहि द्या असें म्हणतों;
घ्या घ्या दुवाच म्हणतां स्मारककार्यार्थ सकलही गणितों. ९
आगापिछाहि नसतां असतां मुंबइंत राष्ट्रमतकाळीं
शेजार मयूराचें जाणें, नच भूमि गोरि वा काळी. १०
योगायोग विचित्रचि तो करि मजला मयूर कीराला,
तोचि मुखें वदवितसे, यद्गृह तें द्याचि त्या मयूराला. ११
साळी माळी शिंपी सुतार सोनार सर्व गांवकऱ्यां
सद्गति दे म्हणुनिच तो जाणा काढी मयूर नाकधुऱ्या. १२
तो मन्मयूर मजला बारामतिमाजि भरचि एक मती
बारामती स्फुरवितो, स्फुरवो सकलां, कधूं न अल्पमती. १३
श्रीरामनाममंत्रा जाणतसां कीं त्रयोदशाक्षर तो
श्रीरामरूपचि अशा बारामतिला पुरा न कां होतो ? १
यत्सत्स्मरणप्रेमा मुक्ताईमठचि पंढरिस कळवी,
त्यांच्या किशोरकेकाश्रवणें पोटीं कशी न कळकळ वी ? २

रचनास्थलकाल } जनान्तर्गतरामकृपाभिलाषी
इंदूर ता. १९।१।२४ } **रामकृष्ण दत्तात्रेय पंतपराडकर**

श्रीरामः शरणम्

हस्तौ दानविवर्जितौ श्रुतिपुटौ सारस्वतद्रोहिणौ
नेत्रे साधुविलोकनेन रहिते पादौ न तीर्थाटनौ
अन्यायार्जितवृत्तिपूर्णमुदरं गर्वेण तुंगं शिरो
रे रे कुक्कुर मुंच मुंच सहसा निंद्यस्य निंद्यं वपुः ॥ १ ॥

तन्वी चारुपयोधरा सुवदना श्यामा मनोहारिणी
नीता निष्करुणेन केनचिदहो देशांतरादागता
उत्संगोचितया तया रहितया किं जीवनापेक्षया
भिक्षो ते दयितास्ति किं ? नहि नहि प्राणप्रिया कुंडिका. ॥२॥

संग करनकूं संत है सुनवेकूं जो पुरान ।
है तरनेकूं लीनता बुडवेकूं अभिमान ॥ १ ॥

---

श्रीमत्करुणामृतघनरामस्मरणानंदित

# भक्तमयूरकेकावलि.

श्रीरामचंद्राय नमः

श्रीरामा ! तूं स्वामी असती माज्या शिरावरी जागा;
आम्हांसि तुज्या पायांवांचुनि निर्भय नसे दुजा जागा. १

बहु जन्म विसरलों तुज, परि तूं आम्हांसि विसरला नससी,
अंतर्बाह्य कृपाळा ! सर्वां जीवांसि वेष्ठुनीं असती. २

कल्पद्रुम तूं रामा ! ज्याची जसि भावना तसा फळसी;
भोगिति दुःखें जीव स्वगुणें, तूं निर्दयत्व नातळसी. ३

" सत्संगती धरावी, सच्छास्त्रश्रवण आदरोंचि करा, "
म्हणसी, "मग मीं बुडतां देइन भवसागरीं तुम्हांसि करा." ४
सत्योपदेशवाक्यें तुझीं असीं ऐकिलीं; परंतु मन
आटोपेना रामा ! म्हणुनि तुला करितसें सदा नमन. ५
आतां प्रभो ! दयाळा ! मज दीनावरि करूनियां करुणा
स्वपदाब्जीं मन्मानसभृंग रमो उगउ दे कृपाअरुणा. ६
नाहीं सहाय तुझिया नामाविण निपुण मज जगत्रितयीं;
त्वन्नाम मित्र जेव्हां, सत्संग घडे त्रिलोकमित्र तयीं. ७
म्हणउनि नाम तुझें या मुखांत राहो सदाहि मधुरतम,
रत मन जेथें मुनिचें ज्यांचें गेलें समस्त दूर तम. ८
उद्धरिला जो पापी पुत्रमिषें नाम घे अजामिळ तो,
तारीं हाहि जन तसा, दंभेंहि जरी पदीं तुजा मिळतो. ९
अपराध फार केले, परि आतां हात जोडिले स्वामी !
करुनि दया तारावें; आवडि वाढो सदा तुझ्या नामीं. १०
सेवक तुजा म्हणवितों, श्रीरामा राघवा सख्या म्हणतों;
होसी उदास तरि हो, होत नसें मीं उदास आपण तों. ११
संसारसागरीं तूं तारक ऐसेंचि संत वदतात;
वदतां तदीय नामें देतो दासांस तो स्वपद तात. १२
ऐसें औदार्य तुजें प्रभुत्व करुणाकरत्व ऐकोनीं
आलों शरण स्वामीं ! जोडुनियां हस्तमस्तकीं दोनीं. १३
पायें मज दीनाला रामा ! लोटूं नकोचि बा ! दूर.
उद्धरिले बहु पापी, याविषयीं तूं रघूत्तमा ! शूर. १४
क्लेशाक्रांतस्वांत श्रीरामा ! तुज जरी न विसरेल,
तरि भय नसेचि कांहीं, साराही क्लेशतापहि सरेल. १५
आम्हांसि नाम मात्र क्लेशाब्धीमाजि नाव हें ठावें;
गावें तेंचि प्रेमें, स्वबिरुद रामा ! तुवांहि गांठावें. १६

केवळ भजनाचिकडे जरि ठेविसि दृष्टि तरि नसे थारा,
आपलिया थोरपणावरि ठेउनि दृष्टि दीन हा तारा. १७
स्वामी ! आम्हीं दुर्बळ, तूं रघुवीरा ! समर्थ, यासाटीं
देवुनि अभय करातें ने स्वस्थानासि, शुद्ध यश थाटीं. १८
धाव समर्था ! सदया ! भवपंकामाजि बुडतसे गाय !
निकटस्था ! धर्मज्ञा ! कौतुक अद्यापि पाहसी काय ? १९
करुणाघन तूं माथां, जाळितसे मज मृगासि भववणवा;
वृष्टि न करितां होतां उदास हें योग्य तूज न सकणवा ! २०
संकट वारुनि रामा ! निजगुणकीर्तन करावया योजीं,
आपलिया थोरपणें रामा ! मजला स्वकिंकरीं मोजीं. २१
तूं जरि न पावसी तरि पाचारूं संकटांत मी कवणा ?
श्रवणारूढ करुनि हे विनती रक्षीं मला पदप्रवणा. २२
सीतापते ! रघुपते ! विश्वपते ! भूपते ! वदान्यपते !
इंद्रादिकीर्ति तुझिया कीर्तिपुढें तुच्छ, सर्वथा लपते. २३
सोडविले सुर सारे रावणकारागृहांतुनीं देवा !
जे तत्सेव्यहि त्याची करीत होते तदाग्रहें सेवा. २४
देवस्त्रीही दासी केल्या होत्या दशाननें दुष्टें
त्या सोडवूनि त्यांचीं चित्तें केलीं तुवांचि संतुष्टें. २५
गंधर्वीं तुज गावें ते त्याणें लाविले निजस्तवना,
तवनामधारकांतें सोडविलें त्वां करूनियां अवना. २६
त्वच्चरणार्चनतत्पर मुनि वनवासी दशाननत्रस्त
त्यांस सुखविता जाला प्रभो ! तुजा अभयदानपटु हस्त. २७
त्वद्भक्त शुद्धकर्मा बिभीषण प्राज्ञ रावणें छळिला,
येतां शरण तुला, त्वां हृदयीं स्वभुजीं धरूनि आवळिला. २८
वाळीनें स्त्री हरिली, मारिलही आपणासि या त्रासें
सुग्रीव शरण आला तुज, तो त्वां रक्षिला अनायासें. २९

ब्रह्मादिकांसि दुर्लभ पदरज ज्याचा अलभ्य तूं ऐसा,
शबरी वर्णादिगुणें न बरी तिस पावलासि तूं कैसा ? ३०
गुहनाम निषादपती स्वभक्तिसंपन्न त्यास बंधुपणें
त्वां मानिलें दयाळा ! दासांचे नाशितोशि ताप पणें. ३१
चरणविलोकनतत्पर वानर आप्तांत राघवा ! गणिले;
साधुद्वेषी जे जे कुळतरु त्यांचे समूलही खणिले. ३२
गौतमपत्नी गिळिली होती जे पापतापशापाहीं
ते उद्धरिली जैसी, मज निजकरुणालवें तशा पाहीं. ३३
रक्षो भीतीपासुनि गाधिजमख रक्षिला जसा राया !
हो सिद्ध तसा संकट मज दीनाचेंहि आज साराया. ३४
दंडकवन खळ मर्दुनि निर्भय केलें जसें प्रतापानें,
गतभय हा शीघ्र करीं, जाला बहु विकळ विप्र तापानें. ३५
आलों म्हणुनि शरण तुज, सहजदयेचाचि पूर्ण सागर तूं,
तुजविण कवणा ठाईं तापोपशमार्थ आज सांग रतूं ? ३६
तूं बाप माय बंधू धणी सुहृन्मित्र जानकीजाने !
करुनि दया विलयाला अति सत्वर संकटास माज्या ने. ३७
श्रीरामा ! सुखधामा ! पावननामा ! स्वभक्तविश्रामा !.
कामारिगीतकीर्ते ! करुणामूर्ते ! नको त्यजूं आम्हां. ३८
रामा ! धांव, रघुपते ! धांव, विभो ! धांव, राघवा ! धांव;
कौतुक काय पहासी आळवितां यापरी तुजें नांव ? ३९
नांव तुजें नावचि या संसारांभोधिला तरायासी,
तें हृदयीं धरुनीही मी कां अद्यापि सांग आयासी ? ४०
या दीनानें आतां पसरावा पदर सांग कोणाला ?
तूजा प्रताप बसला लपोन जाऊनि काय कोणाला ? ४१
जरि दास परानें हा अपराधावीण दंडिला, राज्या !
हें अश्लाघ्यचि तुजला, नृपनीति तुम्ही मनीं विचारा ज्या. ४२

तुज दीनबंधु म्हणती, म्हणउनि मी दीन मारितों हाका;
हा काय दीन लटिका, जे कां निजबंधुता तुम्हीं टाका ? ४३
दीनास संकटीं जरि सहाय होशील योग्य हें तूतें;
आळस न करीं माज्या स्वरक्षणातें सुकीर्तिहेतूतें. ४४
दीनानें किति सद्गुणहीनानें विनविलें तुला आजी,
बा ! जीवदान दे गा ! प्रभो ! उपेक्षा करूं नको माजी. ४५
हृद्गत तुजला कळतें हृदयस्था राघवा ! जगज्जनका !
जन काय तत्व जाणें ? प्रभो ! उपेक्षा करूंचि आज नका. ४६
सर्वा लाभांहुनि बहु लाभ असे त्वत्पदांबुरुहभजनीं,
मज नीतिज्ञा ! भजतां संकट न पडो दिजेचि अशुभ जनीं. ४७
अन्याय लेश नसतां गांजिति उद्धृत्त हें तुलाचि कळो;
किकळोनि सांगतों तुज या दुःखें न मन आमचें विकळो. ४८
कळिमाजि क्षुद्र नृप प्रजेसि देती धनार्थ बहु ताप,
पापप्रसक्त लोभी न पाहती धर्म माय कीं बाप. ४९
तूं परि सर्वांचा पति शासनकर्ता उपेक्षिसी कां हें ?
'साहें उगेंचि' म्हणसी, माझें बळ येथ काय तें पाहें ? ५०
खळ जे हे सत्पीडक त्यांची तुज काय राघवा ! भीड ?
त्वद्दास तवसमक्षचि गांजिति, येणें कसी न ये चीड ? ५१
सिंहासमक्ष त्याच्या बाळाला जाचितील जरि कोले,
तरि मग अशास पंचानन मृगपति कोण जाणता बोले ? ५२
अपराधी सेवक तरि दंडावा स्वामिनेंचि, हें युक्त
उक्त श्रवण करुनियां करिं मजला संकटांतुनीं मुक्त. ५३
श्रीरामचंद्र ! राघव ! रघुवीर ! असेंचि आळवीन तुला.
संकट वारुनि घडवीं माज्या हातूनि या महात्र तुला. ५४
एकान्तीं त्वन्नामें गायिन मधुरस्वरें स्थिरस्वांतें,
संकट वारुनि द्यावें हें मज वरदान जानकीकांतें. ५५

या संकटाबरोबर वारीं लोकेषणादि अनिवार्य,
म्हणजे हा दास तुजा जाला लोकत्रयांत कृतकार्य. ५६
अन्नाच्छादन देतें दुसरें बा ! कोण सांग विश्वास ?
म्हणताति ' आयुरन्नं प्रयच्छति ' प्राज्ञ, तेथ विश्वास. ५७
त्वद्गुणकीर्तन करितां लज्जा हे पापिणी धरू न गळा;
हे ताटकांतका ! हा परमार्थ इणेंचि बुडविला सगळा. ५८
तुजला धरीन हृदयीं म्हणजे लज्जा पळेलसे वाटे,
दाटेल प्रेम तयीं शमेल ते ताटका तसी वाटे. ५९
खळ हांसतील तेंही सोसाया सहनशीलता द्यावी;
लावीन मस्तक तुज्या पदीं, तुजी भक्ति आत्मविद्या वी. ६०
त्वद्गुणकीर्तन करितां स्तंभादिक अष्टभाव उपजावे,
जावे अनात्मधर्म क्रोधादि मनोविकार वरजावे. ६१
हा काम रामराया ! पुरवावा, कल्पवृक्ष तूं साचा;
ज्ञाता सर्वगत प्रभु आत्मा प्रिय निर्निमित्त दासाचा. ६२
मन हेंचि फार इच्छी कीं आतां सेवणें तुजे पाय,
तुजवांचुनि इतरांच्या भजनीं मजलागि होय फळ काय ? ६३
केलें म्यां मनुजांचें आर्जव बहु चाटुकारही जालों,
परि तेथ ताप पावुनि पुनरपि तुजलागि शरण मी आलों. ६४
प्रमदांत पावुनीयां श्रम दांत क्षुद्र विचकती कीं जे
त्यांची तशाच लोकीं सेवा तुजला न जाणतां कीजे. ६५
दुर्व्यसनी धर्मरहित निरक्षर क्षुद्र त्यांसि मी नमनें
करुनि श्रमीच जालों, आलों तुज शरण आज दीनमनें. ६६
रामा ! शत्रुभ्राता आला तुज शरण त्यासि राज्यपद
लंकेचें अर्पियलें, कोण न वंदील तें तुजेंचि पद ? ६७
शरण तरी तुज यावें, नमन करावें तुलाचि सुज्ञानें,
गावे तुजेचि गुण बा ! सेवावें तुजचि मातृगज्ञानें. ६९

म्हणवुनि तुमचें नामचि राम असें हें मुखीं सदा राहो;
हा ज्ञानहीन दीन प्रसन्न होवूनि शीघ्र तारा हो ! ६९
प्रभुजी ! तुमचें सज्जनउदारपण वर्णितात बहुसाल,
सालसता मन्त्राणीं धरितां, शब्दांत सर्व गवसाल. ७०
आळचि घेवुनि मी शिशु आळवितों, निष्ठुरत्व दुर वाळीं;
आळ निवारुनि मातें, आळस टाकूनि धांव, कुरवाळीं. ७१
पाळक तूं विश्वाचा, बाळकसा तोंड पसरितों बा ! मीं,
व्याळकराळकठिनतर काळ कसा वारिसी न हा स्वामी ? ७२
तूं करुणाघन रामा ! मी चातक पसरिलें असे आस्य;
नामामृतकण न मिळे, तरि लोकीं फार होतसे हास्य. ७३
विश्वैकमान्य दशरथ, कौसल्या वीरसू सती धन्या,
तत्पुत्र तूं रघुपते ! उपमा तुजला तुजी, नसे अन्या. ७४
ज्ञाता तूं, दाता तूं, त्राता तूं, वीर धीर भर्ता तूं;
जनपीडाहर्ता तूं श्रीरामा ! मुख्य विश्वकर्ता तूं. ७५
ब्राह्मणरक्षणसक्षण दक्षिण अक्षीणसद्यशोधाम,
जलदश्यामल कोमल कलिमलहर हरमनोज्ञ रघुराम. ७६
सुरवरमुनिवरनृपवरनुतगुणगण वरद परमसुखसदन;
त्रिभुवनसमवनपटुभुज भवदवभयशमन रुचिरतरवदन. ७७
ऐसें गायिन तुजला, हा माजा काम पूरवीं वरदा !
हर दासाचें संकट रामा ! भवसिंधुमग्नजनकरदा ! ७८
स्तुति करुनि तुजी तुजला आम्ही अज्ञान काय बा ! रिझवूं ?
गावुनि अमृतगुणातें हृदयींचे ताप आपुले विझवूं. ७९
शेषप्राचेतसमुनिपराशरव्यासनारदर्षिशुकीं
गातां गुण पार नसे, यांच्या येथील कोण अन्य तुकीं ? ८०
परि भावें गुण गातां प्रसन्न होतोस तूं असें ठावें
जाळें सज्जनसंगें प्रेम कसें तें मनांत सांठावें ? ८१

शाहणपणें न रिझसी, मूर्खपणें न खिजसी, भले म्हणती;
प्रेमळ भलताहि असो, करिसी त्याची स्वसेवकीं गणती. ८२
होसी प्रसन्न भावें, देसी सर्वस्व आपुलें भजकां,
सत्संगीं बसतों मी, न कळे इतुकेंहि राघवा ! मज कां ? ८३
संतांच्या वदनें मी आयिकिलीं बा ! तुजीं जयीं चरितें
त्यजुनि विषय मन केलें भरावया गुणसुधा तयींच रितें. ८४
साकेतपते ! रामा ! नाकेशनुता ! त्वदीय गुण गातां
हाकेसरिसा येवुनि हा केवळ दीन उद्धरीं आतां. ८५
चापशरधरा धीरा आपद्ग्रस्तासि मज नको विसरूं,
या परम संकटीं मी बा ! पदर दुज्यापुढें किती पसरूं ? ८६
आधार तूं जनाचा, बाधा हरणार एक तूं दक्ष
साधावया यशातें बा ! धांव, तुला नमस्कृती लक्ष. ८७
जळदनिभा ! बळसिंधो ! खळमथना ! सूर्यकुळमणे ! कृपण !
मी विकळ जाहलों बहु; काय तुजें लोपलें दयाळुपण ? ८८
मज भणगाला वरदा ! वर जरि करुणा करूनि देशील,
तरि मानवती सज्जनमनें जयाला असोंचि दे शील. ८९
विश्व तुजा ठायीं, तूं नामीं, तें नाम साधुच्याचि मुखीं,
तत्संग दे मला, मग गुंतेना मीं कदापि तुच्छ सुखीं. ९०
लक्षापराध घडले, रक्षावें परि तुला शरण आलों;
दक्षाध्वरहरचिंत्या ! दक्षा ! मी मग्न संकटीं जालों. ९१
संग धरुनि विषयांचा भंगाचि मन पावलें, परी न विटे;
साधुसमागमभेषज साधुनि देशील तरिच मोह फिटे. ९२
चित्त अनावर रामा ! वित्तस्त्रीपुत्रचिंतनींचि रते,
मधुलिप्त क्षुरधारा चाटी ते जीभ तत्क्षणीं चिरते. ९३
निपटुनि विषय त्यजितां सुखमुख दृष्टी पडे, झडे ताप;
हें सत्य अत्यबाधित तेथें संताप जे स्थळीं व्याप. ९४

तनुनिर्वाहापुरता संग धरुनिही अनर्थ मज घडला,
सावध तऱ्ही निसरड्या मार्गी विचकूनि दांतमुख पडला. ९५
शुद्धचरित्रा रामा ! युद्धपटुभुजा ! प्रबुद्धसेव्यपदा !
उद्धवनिधे ! दयाळा ! उद्धरिं मजला, नमीन तूज सदा. ९६
शर्वप्रियसच्चरिता ! सर्वजगत्पाळका ! अगा बापा !
पर्वसुधाकरकररुचिगर्वहरस्मितमुखा ! हरीं तापा. ९७
नाना भयें विलोकुनि पावतसे फार फार तनु कंपा;
शिर ठेविलें पदांवरि, उशिर न लावीं, करींच अनुकंपा. ९८
मन हें घातक वेडें विषयव्यालासवें करी क्रीडा,
पीडाहि पावतें, परि सावध नोहे, न तें धरी व्रीडा. ९९
या कोटग्या मनाला विषयीं या काय वाटते गोडी ?
खोडी तुज्या प्रतापावांचुनियां राघवा ! न हें सोडी. १००
बहुसंख्य चपळमर्कटकटकें आज्ञेंत वर्तलीं नीट;
वीट न धरशील तरी माझें मन काय तुजपुढें धीट ? १०१
श्रीसद्मीं पदपद्मीं होयिल मन भृंग, दाखवुनि पाहें;
लब्धसुदुर्लभविषय त्यजिल कसें ? बहु सतृष्ण सकृपा ! हें. १०२
दे अभयदान देवा ! सेवारत मी तुजा विभो ! भाट;
त्यजितां अनादरानें करीन लोकांत फार बोभाट. १०३
त्वच्चरणाराधन मी जाणत नाहींच लेशही इतर;
नामचि गातों, येणें प्रसन्न होवूनि अभय तूं वितर. १०४
आहे प्रसाद मजवरि म्हणुनिच वदनासि येतसे नाम,
हें जरि मुखा न येतें, होता कैंचा मनासि विश्राम ? १०५
विकळमना मीं जें कीं वदलों त्याची करीं क्षमा आर्या !
जे सहनशील दक्षिण कृपाळु विश्वार्ह बुध तदाचार्या ! १०६
दुःख न रुचे, सुख रुचे, कर्में करितां विवेकही न रुचे;
अमृतफळ कसे देतिल पल्लवपाणी स्वकीय विषतरुचे ? १०७

हें सर्व सत्य तोंवरि जोंवरि तुज शरण पातलों नाहीं,
आतां थोरपणासाचि आपुलिया मात्र राघवा ! पाहीं. १०८
गंगेला जावुनियां गावखरीचा मिळे जयीं वोढा,
तयिं ते न म्हणे, 'मागें हा कश्मळ शिवतसे, धरा वोढा.' १०९
तूं करुणाघन रामा ! भक्तमयूरासि तूंचि सुख देशी,
सन्निधि असोनि बापा ! न करीं या किंकरासि परदेशी. ११०
विश्वंभरा ! भरवसा आहे या किंकरासि फार तुजा;
जें योग्य तें करावें दीनजनोत्धारणैकदक्षभुजा ! १११
हा दीन रामनंदन चकोर, तूं चंद्रमा रमानाथा !
दे चित्तस्वास्थ्य बरें, गायीन तुज्या यशोंकिता गाथा. ११२
बहु गोड गुण तुजे ते ऐकावे आदरें स्वयें गावे,
यावेगळे मनोरथ नसती ते तूज काय सांगावें ? ११३
सौमित्रे ! मजविषयीं तूं आर्यप्रार्थना करीं कांहीं;
भक्ति तुजी श्रीरामीं बहु कथिले सत्यशीळ लोकांहीं. ११४
श्रीभरता ! राघवपदलाभरता ! अग्रजासि तूं विनवीं,
मज दीनाला रक्षुनि साधावीं सद्यशें असींच नवीं. ११५
शत्रुघ्ना ! भगवज्जनशत्रुघ्ना ! राघवासि हें कळवीं.
माझें भवभय सारें रामनिदेशेकरूनियां पळवीं. ११६
माते ! सीते ! बायी ! प्रार्थावें नृपतिला तुवां आंगें;
सुखदुःख तुला ठावें; मजविषयीं उचित तें स्वयें सांगें. ११७
भगवद्भक्त हनूमन् ! साधो ! साधो यश प्रसिद्ध तुजें;
मजसाठीं रामाचे पाय धरीं निजशिरीं प्रतापि भुजें. ११८
आगें रिपुबळहर्ता, बाहुबळें ब्रह्मगोळउद्धर्ता,
तूं मारुते ! पुमर्था देशी रघुवीरसेवनसमर्था. ११९
अद्भुत चरित्र त्रिजगीं लोकोद्धारार्थ कारि सुखें विभु जें,
तें त्वच्चरितसखें बा ! त्वांही केलें चरित्र तोंवि भुजें. १२०

मजहूनि भक्त माझा समर्थ हें आपणांस वांचविलें
त्वां संकटीं असें शुचिजनास कथुनि स्वतत्व सूचविलें. १२१
मच्छक्तिचे स्वरक्षक भक्त भले हें धरासुता शोध
त्वां केला, वांचविली हा कुशळालागि सुचविला बोध. १२२
तूं तो राघव, राघव तो तूं, तुम्हांत तों नसे भेद;
सप्रेम भक्त देवचि, विधुप्रसादीं समान दृग्वेद. १२३
आयास मदुद्धरणीं लेष नको, सुलघु मीं सदंघ्रिरज;
द्रोण नव्हे, अचळ नव्हे, सहस्रमित ज्यांत तुल्य सिंह गज. १२४
जेथ तुम्ही तेथुनि मज पहा कृपामृतरसार्द्रदृष्टीनें,
हृत निर्मितसृष्टीनें शरणागतमरुसुधौघवृष्टीनें. १२५
दृष्टिमृगी ही तुमची राघवपदरागमोहिता आहे,
मज वीतरागरंका निजसुखभरमंथरा कसी पाहे ? १२६
मन मात्र मला अणुला स्मरो, तरो तेव्हड्याचि तद्यत्नें;
अणु परमाणुचि तारू हृत्पदिंचा हें किजे कुशलरत्नें. १२७
मी विषयपिंड परवश घरोघरीं मर्कटांस आप्त गणीं.
म्हणुनि तरि तुल्य भावें पाहें, न तरी त्यजीं गतासुगणीं. १२८
संतांसि तरी प्रेरा, जडतारक ते तुम्हांहुनी न उणे,
भूतीं बहु सदयहृदय, पाववितीं सहज अखिल आत्मखुणे. १२९
भूतें भगवंतचि ते सताचि, परि यांत किति निर्जी लग्न ?
दिसती गृहस्थवेषें, परि सम्यक्न्यासपदसुखीं मग्न. १३०
को ही श्रीमन्नारदशुकादिकविमुनिपराशरव्यासीं
हरिगुणसुधाकणाहीं जनसिंचनिं पडियलें सुहव्यासीं. १३१
या चातकलक्षाचें सारस्वत तेंचि जीवन प्राज्य,
इतरहि जीवन इतरां, हे भीक बरी, नको बुचें राज्य. १३२
संतीं पंडितपंतीं अंतीं स्वंतीत चित्त या धरिजे.
कीं देवा सरसनिरस न पाहतां सकट शरण उद्धरिजे. १३३

हेचि अविद्या लंका, तेथ अहंकार दशमुख क्षुद्र;
याचें दहन विखंडन जडजीवोत्धरणपटु सितसमुद्र. ? १३४
संत भगवंत साचे, परि भगवंतापरीस हे थोर,
हे आंगें अंधाची यष्टी होताति थोर बहु थोर. १३५
काळिमाजि पुंडरीक क्षेत्रीं सितपक्षकार्तिकाषाढीं
संत अमृतरस पाजुनि म्हणती, घे हे प्रपा, रहा, काढीं. १३६
नीलमणिद्युतिभावितपीयूषरसऱ्हद प्रसन्न वरा,
ताप शमे, तृप्ति गमे, चित्त रमे उपरमे, सुसेव्य खरा. १३७
वैकुंठचि हें विठ्ठलपदमंडित पुंडरीकसुक्षेत्र,
तेथें हरिगुणकीर्तन, येथेंही तेंच साश्रुजननेत्र. १३८
वृत्थ तपस्वी पितृपदसेवनसर्वस्व पुंडरीकमुनी
पितृभक्ति पूर्णकाम श्रीरामा दावितो उभा करुनीं. १३९
गुरुसेवा सद्विद्या पढवाया राम पातला बहुधा
येणें प्यालेहि सुधा सुचला हितमार्गही सुधाच बुधा. १४०
आपण सेवा घेउनि पितृचरणीं जोडिली पुन्हा बेडी,
हा पितृभक्त रघूद्वह, कृष्ण नव्हे, बुद्धि नायके वेडी. १४१
रामत्रय त्यांमध्यें मध्यम तो राम मी, असें हातें
धरुनी नितंबबिंबा दावी खुण रामचंद्र, पाहा तें. १४२
वृत्ति यदृच्छालब्धें करा, स्मरा मज, धरा तनुसि हातीं;
मग मी आळिंगाया उभाच हे सुचवितो बुधव्रातीं. १४३
मध्यें कर मी म्हणतां, नरलोकीं सत्क्रिया समाधानें
करुनी अन्नोदक द्या भूतीं आर्तीं, स्वासिद्धि या दानें. १४४
विरहें करक्रियांच्या अकर्तृता पूर्णकामता सुचवी,
करुणोत्कंठ दीनमोत्धारीं हें उभ्यापणीं रुचवी. १४५
तूं तों येथेंचि उभा, अंतीं आम्हांसि ठेविशी कोठें ?
तरि आपल्या सख्याला पोटीं म्हणतो न बोलतां ओठें. १४६

भक्तप्रेमाचा मीं परम भुकेलों असें, असें कळवी
कटिवरि कर ठेउनियां उभा, खरा तर्क हा, न दुर्बळ वी. १४७
विषय पहातां सादर तरि जातों म्हणुनियां उभा रुसतो,
हितबोधग्रहणास्तव करुणाब्धि क्षोभला भ(म)ला दिसतो. १४८
मी साक्षी, या सर्वीं अखंड दंडायमान, लिप्त नसें,
शरणागतास भेटें उभाउभीं कळवितो स्वतत्व असें. १४९
प्रेमळ भक्तांहीं मज भेटावें कडकडूनि पोटभरी,
कटिं कर ठेवुनि भीमातटीं उभा शुद्धभक्त्यधीन हरी. १५०
होती कैवल्याची कलिकाळीं लूट, जे असी न कधीं
मागेंहि गोप्रतारीं जाली सरयूंत एकवेळ तधीं. १५१
सर्वस्वदान केलें पात्रीं, क्षेत्रीं स्वमूर्तिसर्वस्व
न सरे अनंत लुटितां, सत्धन सदधीन लुटितसे विश्व. १५२
हे इंद्रनीळमणिच्या कांतिरसाचीच वोतिली मूर्ति,
मन तृणकण लिगटतसे, तुम्हीं बरी पाहिली खरी पूर्ती. १५३
हा विठ्ठल ठक, ठकिले ठक, ठक पडलें ठकांसि जें हरितो;
नामचि देतो दाउनि निजार्थ, जनसंचितार्थ संहरितो. १५४
यासहि नामा ठकडा भेटे, मग यासि ठकविले तेणें
सद्गुण गाय सुनिपुणें वेधियला कृष्णसारसा जेणें. १५५
ऐसे भगवत्तत्पर सदयहृदय संत पंत भेटावे,
ते सच्छिक्षादाते मुमुक्षुबुद्धीसि होति नेटावे. १५६
सत्धृदयवशीकरण श्रीमत्सीतानिवास या मनुनें
त्याच्या जपीं असावें निरत सदा मीं सचित्तवाक्तनुनें. १५७
हे भरतसुमित्रात्मज ! हे सीते ! माय आयका विनती,
सिकवा साधुजनाला कैसी शरणागतें करावि नती. १५८
तुम्हीं वसिष्ठगाधिजमुनिमुखसच्चरणसेवनोद्युक्त
गुरुजनभजन शुभ जनीं शिकवा, होयीन भवभयोन्मुक्त. १५९

श्रीमंदिरइंदीवर हें भ्रमराहित प्रसिद्ध तीर्थतटीं,
इत्थांसि गमे सरयूनिकट उभा राम निहितपाणिकटी. १६०
अंभोदसंनिभ सुभग भाविकजनभव्यभाग्यभर भोळा
भासे उभा शुभाशय शयविधृतनितंबबिंब हरि डोळां. १६१
निजपदजलजभजकजन जगांत बहु पूज्य हरिसि कीं शिव ते.
प्रत्युत्थान दिलेसें गुरुतर्कपदा अशा मती शिवतें. १६२
श्यामळ विमळज्योति स्वयंप्रभ प्रकट चित्र तम हरितें;
करितें तर्क असा मन, पतंग शमती विलोकितां हरितें. १६३
ताप शमे तम नाशे या तेजें हें विलक्षण प्रकट;
वर्णें सुनीळ उज्वळ मनःपतंगासि जीववी निकट. १६४
हा अवधूत विलक्षण सपरिग्रह आणिखी उदासीन,
याणें या सत्क्षेत्रीं नाम्याची सोडिलीहि दासी न. १६५
हा बाळक नंदाचा वसुदेवाचा खरा दशरथाचा
कोणेक विरळ यातें वदती तत्वज्ञ पति अनाथांचा. १६६
हा सुमणि मनश्चुंबक विष्टपचिंतामणी विषघ्नमणी
स्पर्शमणी अमृतमणी सुरमणि चूडामणी मणींद्रधणी. १६७
हा कल्पपादपाचा रोपा लसलसित कोवळा सोपा,
याच्या हृदयीं आहे खोपा, घेतात हंस सुखझोंपा. १६८
गोरा नंद, यशोदा गोरी, वसुदेव दशरथहि गोरा;
तत्सुत काळा कां तूं? भोळे जन ठकविसी हृदयचोरा! १६९
काळा कां हें कळलें मजला, तूं नीळकंठकंठमणी,
भोळ्या शिवें दिलें तुज पुंडरिकातें रिझोनि साधुपणीं. १७०
तूं सोय जाणसी बहु, दीनांचा सोयरा खरा सुभगा!
राखिसि लाज जनाची, हें संसारांत जोडिलें शुभ गा! १७१
जीवोत्धारीं करुणा, श्रुतिनिष्ठांचीहिं भीड वागविशी;
वेषान्तरें कळित बहु जन तारिसि, साधनीं न भागविशी. १७२

तूं सज्जनशुकपंजर कंजरमणवंशमणि वतंसपद
खळशमन बळशमनशेरकर हरहर हरहृदयहर विरक्तपद. १७३
भक्तमयूरदयाघन तूं रामा ! भवदवार्तविश्रामा !
साष्टांग नमन तुजला भुजलालितनिजजना गुणग्रामा ! १७४

इति श्रीमत्करुणामृतघनरामस्मरणानंदितभक्तमयूरकेकावलि.

श्रीरामपदार्पितास्तु

---

# आशंसाष्टक

( वृत्तः—माल्यभारा )

तवपादसरोरुहीं स्वचित्तभ्रमरातें रस चाखवूनि गोवूं;
तुज भक्त तुजे सदैव गाती, मृग आम्ही गुणगीतसक्त होवूं. १
मज वाटतसे सभाग्य मोटें, भगवद्भक्त तयांत म्यां जुडावें;
तदधीन तुज्या यशःसुधेचा ऱ्हद गंभीर तयामधें बुडावें. २
तुज वर्णिति संत संगमुक्त प्रकृतिप्रेमळ तद्गुणीं शिरावें;
तुजिया गुणसागरांत माजें मन हें सैंधव माधवा ! विरावें. ३
गमतें भगवज्जनप्रसंगें मज टाकूनि गृहादिलोभ जावें;
करुणावरुणालया मुकुंदा ! तुजला सादर सर्वदा भजावें. ४
तुजला रघुनाथ रामचंद्र प्रभुजी यापरि नित्य आळवावें;
मन चंचल हें त्वदंघ्रिपद्मीं जडतां न क्षणमात्र चाळवावें. ५
मन हें विषयीं उडीच घाली, विष हें जाणुनि त्यावरी विटावें.
तव कीर्ति उदार कामधेनू, तिस मी होउनि वासरूं चिटावें. ६
तुज एक अनेक भूतभेदीं घटतोयार्क अशेपरी पहावें.
भजकार्पितभुक्तपादराजतुलसीदाम शिरीं सदा वहावें. ७
त्रिजगन्नयनप्रमोदहेतु त्वदुदारांघ्रिसरोज म्यां नमावें.
मधुपत्व धरूनियां रमावें, स्वसुखें त्या भुवनत्रयीं न भावें. ८

इत्याशंसाष्टकम्.



| आर्या—चरण | अशुद्ध | शुद्ध |
| --- | --- | --- |
| २०—१ | भववणवा | भववणवा |
| ४८—१ | उद्वृत्त | उद्वृत्त |
| ७७—२ | रुचितर | रुचिरतर |